वर्ष ५८ वे । अंक ३०३ । पृष्ठे ६ । किंमत २ रूपये । मंगळवार २ जून २०२६

PR No. G-2/RNP/NND-251/2024-2026 dainiksatyaprabha2015@gmail.com dainik_satyaprabha epaper.satyaprabha.com

## गुंतवणूकदारांचे ३.७५ लाख कोटी बुडाले

*मुंबई : आठवड्याच्या सुरुवातीला दमदार तेजीने सुरुवात करणाऱ्या भारतीय शेअर बाजारात मोठी घसरण झाली. सेन्सेक्स ५०० हून अधिक अंकांनी घसरला, तर निफ्टी २३,४०० च्या खाली घसरून बंद झाला. या घसरणीमुळे गुंतवणूकदारांच्या संपत्तीत तब्बल ३.७५ लाख कोटी रुपयांची घट झाली आहे. अमेरिकेने इराणमधील काही ठिकाणांवर केलेल्या हल्ल्यानंतर गुंतवणूकदारांनी सावध भूमिका घेतल्याचे दिसून आले.*

दैनिक सत्यप्रभा

बातम्यांसोबत विचार देणारे

## फिफा वर्ल्डकपचा थरार 'झी'वर!

*मुंबई : जगभरातील फुटबॉल चाहत्यांचे लक्ष लागलेल्या फिफा वर्ल्डकपच्या भारतातील प्रसारणाचा पेच सुटला आहे. प्रदीर्घ वाटाघाटींनंतर आघाडीचा भारतीय माध्यम समूह झीने जागतिक फुटबॉलची सर्वोच्च संस्था फिफासोबत एक महाकरार केला आहे. या करारानुसार, फिफा विश्वचषक आता भारतात झीच्या माध्यमातून थेट प्रेक्षकांच्या स्क्रीनवर धडकणार आहे. हा करार केवळ या एका स्पर्धेपुरता मर्यादित नसून, २०३४ पर्यंत असणार आहे.*



**अमरनाथ राजूरकरांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन**

# राज्यातील विधानपरिषदेच्या १७ ही जागा महायुती जिंकणार

### खा. अशोकराव चव्हाण यांचा विश्वास

प्रतिनिधी। **नांदेड**





महाराष्ट्रातील आगामी विधानपरिषदेच्या सर्व १७ जागा भाजपा-शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसची महायुती जिंकणार आहे, असा विश्वास व्यक्त करत, या निवडणुकीच्या माध्यमातून महायुतीची आन-बाण-शान काय आहे, हे आपण नांदेडमधून दाखवून द्या, असे आवाहन माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी आज येथे केले.

स्थानिक स्वराज्य संस्थांमधून विधानपरिषदेवर निवडून द्यायच्या १७ जागांसाठी राज्यात सध्या निवडणूक प्रक्रिया सुरु आहे. त्याअनुषंगाने नांदेड मतदारसंघातून महायुतीचे अधिकृत उमेदवार अमरनाथ राजूरकर यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी सोमवारी (दि. एक जून) आयोजित पक्षाच्या महत्त्वपूर्ण बैठकीत खा. चव्हाण बोलत होते. यावेळी खा. डॉ. अजित गोपछडे, माजी मंत्री डी. पी. सावंत, आ. श्रीजयाताई चव्हाण, आ. डॉ. तुषार राठोड, आ. राजेश पवार, आ. जितेश अंतापूरकर, भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष संजय कौडगे, ॲड. किशोर देशमुख, महापौर कविता मुळे, सभागृह नेते ॲड. महेश कनकदंडे, स्थायी समिती सभापती स. विरेंद्रसिंग गाडीवाले, महिला व बालकल्याण सभापती सदिच्छा सोनी, राष्ट्रवादीचे नेते कैलास गोरठेकर, शिवसेनेचे आमदार बाबुराव कोहळीकर यांचे चिरंजीव शिवराज कदम कोहळीकर, आ. बालाजी कल्याणकर यांचे पूत्र नगरसेवक सुहास बालाजीराव कल्याणकर आदी वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित होते. भाजप-शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून विधानपरिषदेचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या अमरनाथ राजूरकर यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरविले आहे. राजूरकर यांच्या उमेदवारीमुळे महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे.

बैठकीत मार्गदर्शन करताना खा. अशोकराव चव्हाण यांनी अमरनाथ राजूरकर यांच्या कामाचे कौतुक केले. ते म्हणाले, की राजूरकर यांची केवळ पक्षातील पदाधिकाऱ्यांसोबतच नाही तर नगरपालिकेतील सर्व सदस्यांशी आणि स्थानिक लोकप्रतिनिधींशी थेट नाळ जोडलेली आहे. प्रत्येकाच्या सुख-दुःखात धावून जाणे आणि स्थानिक पान २ वर

### प्रमुख नेत्यांसह पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची उपस्थिती

# विधानपरिषदेसाठी महायुतीकडून अमरनाथ राजूरकर यांचा अर्ज दाखल



प्रतिनिधी। **नांदेड**

नांदेड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या विधानपरिषद निवडणुकीसाठी भाजपा-शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे अधिकृत उमेदवार अमरनाथ राजूरकर यांनी आज (दि.एक) आपला उमेदवारी अर्ज महायुतीच्या प्रमुख नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी राहुल कर्डिले यांच्याकडे सादर केला.

विधानपरिषद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस होता. महायुतीकडून अमरनाथ राजूरकर यांनी अर्ज दाखल केला. यावेळी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्यासह खा. डॉ. अजित गोपछडे, माजी मंत्री डी. पी. सावंत, आ. श्रीजया चव्हाण, आ. डॉ. तुषार राठोड, आ. राजेश पवार, आ. जितेश अंतापूरकर, भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष संजय कौडगे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख, महापौर कविता मुळे, मनपाचे सभागृह नेते ॲड. महेश कनकदंडे, स्थायी समिती सभापती स. विरेंद्रसिंग गाडीवाले, महिला व बालकल्याण सभापती सदिच्छा सोनी, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते कैलास गोरठेकर, शिवसेनेचे आ. बाबुराव कोहळीकर यांचे चिरंजीव शिवराज कदम कोहळीकर, आ. बालाजी कल्याणकर यांचे पूत्र नगरसेवक सुहास बालाजीराव कल्याणकर आदींसह नगराध्यक्ष भगवान दंडवे, शंकर बोलमवार, संतोष कुलकर्णी, विश्रांती कदम तसेच तुलजेस यादव, संदीप गाडीवाले, योगेश मुंढे, राजेश्वर देशमुख, मोईज भाई, शकुंतला मुदीराज आदींची उपस्थिती होती.

### आठ उमेदवारी अर्ज दाखल

नांदेड विधानपरिषदेसाठी आज एकूण आठ जणांनी अर्ज दाखल केले. आज अर्ज दाखल केलेल्यांमध्ये अमरनाथ अनंतराव राजूरकर (भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस महायुती), माधवराव पवार (अपक्ष), कृष्णा नागेश पाटील (अपक्ष), ज्योतिबा खराटे (अपक्ष), रामदास पाटील (काँग्रेस), पंकज गायकवाड (अपक्ष), प्रशांत इंगोले यांचा समावेश आहे. मंगळवारी अर्जांची छाननी होणार असून चार जून हा उमेदवारी मागे घेण्याचा शेवटचा दिवस आहे.

### जिल्ह्यात ४५२ मतदार

या निवडणुकीसाठी एकूण मतदारांची संख्या ४५२ आहे. त्यामध्ये किनवट नगरपालिका-माहूर नगरपंचायत ४१, हदगाव नगरपालिका-हिमायतनगर नगरपंचायत ४२, भोकर-मुदखेड नगरपालिका ४८, अर्धापूर नगरपंचायत-नांदेड-वाघाळा महापालिका १०८, कंधार-लोहा नगरपालिका ४६, धर्माबाद-उमरी नगरपालिका ४८, नगरपंचायत नायगाव-नगरपालिका बिलोली-नगरपालिका कुंडलवाडी ६५ आणि नगरपालिका देगलूर-नगरपालिका मुखेड ५४ असे एकूण ४५२ मतदार आहेत.

## संक्षिप्त

### मुख्य न्या. चंद्रशेखर सर्वोच्च न्यायालयात

**मुंबई :** मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर यांची सर्वोच्च न्यायालयात बढती करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायवृंदाने केलेल्या शिफारशीला केंद्र सरकारने सोमवारी सकाळी मंजूरी दिली. गेल्या २२ आणि २७ मे रोजी पार पडलेल्या न्यायवृंदाच्या बैठकांमध्ये या शिफारशीचा प्रस्ताव मांडण्यात आला होता. त्यानंतर हा प्रस्ताव मंजुरीसाठी केंद्र सरकारकडे पाठवण्यात आला होता. त्यावर आज शिक्कामोर्तब झाले.

### अण्णामलाई काढणार नवा राजकीय पक्ष!

**चेन्नई :** तमिळनाडूत अभिनेता थलपती विजय यांच्या नेतृत्त्वात नव्या सरकारची स्थापना झाल्यानंतर राज्यातील राजकीय वातावरण बदलत आहे. त्यातच आता राज्यात आणखी एक नवा पक्ष स्थापन होण्याची शक्यता आहे. तामिळनाडू भाजपातील युवा नेते आणि माजी प्रदेशाध्यक्ष अण्णामलाई लवकरच नवा पक्ष काढण्याची शक्यता आहे. दोन दिवस थांबा. दोन दिवसांनी आम्ही तुमच्यासमोर येतो, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

### नीट पेपरफुटीने घेतला आणखी एक बळी

**भोपाळ :** डॉक्टर बनण्याचे स्वप्न पाहणाऱ्या आकांक्षा चतुर्वेदी या विद्यार्थीनीने नीटच्या नैराश्यातून गळफास लावून आत्महत्या केली. आकांक्षा मूळची मध्य प्रदेशातील मऊगंज जिल्ह्यातील होती. मात्र, ती आपल्या कुटुंबासह नागपूर येथे राहून वैद्यकीय परीक्षेची तयारी करत होती. तिचे वडील कृष्णकुमार चौबे शेतकरी असून, मुलांच्या शिक्षणाचा खर्च भागवण्यासाठी ते नागपूरमध्ये कूक (आचारी) म्हणून काम करतात.

## 'आनंदऋतू' अखेर केरळमध्ये दाखल!

*मान्सूनपूर्व सरींनी महाराष्ट्र सुखावला*

वृत्तसंस्था। **तिरुवनंतपुरम**

संपूर्ण देशाचे लक्ष लागलेला मान्सून आज अखेर केरळमध्ये दाखल झाल्याची अधिकृत घोषणा भारतीय हवामान विभागाने केली. परिणामी, दक्षिण भारतातून हळूहळू वर सरकत लवकर मान्सून महाराष्ट्रासह देशाच्या इतर भागात पोहचण्याची शक्याता आहे.

दरम्यान, आजपासून राज्यात वादळी पावसाचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. मात्र, हा मान्सून नसून मान्सूनपूर्व पावसाच्या सरी सध्या राज्यभरात कोसळत आहे. किमान १० जूनपर्यंत राज्यातील बहुतांश भागात मान्सूनच्या आगमनाची शक्यता नाही, अशीही माहिती प्रादेशिक हवामान विभागाकडून देण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी दमदार पाऊस आणि अधिकृत माहिती मिळेपर्यंत शेतीतील पेरण्या न करण्याच्या सूचना कृषी विभागाकडून देण्यात आल्या आहे. संपूर्ण पान २ वर



### राज्यात १० जूनपर्यंत प्रतीक्षा

महाराष्ट्रात मान्सूनचे आगमन लांबले असले तरी येत्या काही दिवसांत विदर्भ, मराठवाडा, मध्यमहाराष्ट्र आणि खानदेशात मान्सूनपूर्व वादळी पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. सर्वसाधारणपणे मान्सून केरळमध्ये एक जूनपर्यंत दाखल होतो आणि १५ जुलैपर्यंत संपूर्ण देशभर पोहोचतो. गेल्यावर्षी बिपरजॉय चक्रीवादळामुळे मान्सूनच्या आगमनावर परिणाम झाला होता.

## दोन आमदार तृणमूलमधून निलंबित

वृत्तसंस्था। **कोलकाता**


पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसने आपल्या दोन आमदारांना सोमवारी पक्षविरोधी कारवाया केल्याच्या आरोपावरून कारवाई करत पक्षातून हकालपट्टी केली. आ. संदीपान साहा आणि ऋतब्रता बॅनर्जी अशी त्यांची नावे आहेत. राज्य सचिवालयात एका आयोजित पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी पान २ वर

### १७ जागांसाठी लढती ठरल्या; काही ठिकाणी अपक्षांची उडी, चार जूनला चित्र स्पष्ट

# विधानपरिषदेत महायुती विरुद्ध मविआ सामना!

वृत्तसंस्था। **मुंबई**

स्थानिक स्वराज्य संस्थांमधून विधानपरिषदेवर निवडून द्यायच्या १७ जागांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी आज महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशीच थेट लढत होणार हे स्पष्ट झाले आहे.



काही ठिकाणी अपक्षांनी उमेदवारी अर्ज दाखल केले असले तरी चार जून रोजी उमेदवारी पान २ वर

### नाशिकमध्ये मविआचा अपक्षाला पाठिंबा

नाशिकमध्ये महाविकास आघाडीचा अधिकृत उमेदवार नसल्याने तेथील अपक्ष उमेदवारांची भूमिका महत्त्वाची ठरेल. तर छत्रपती संभाजीनगर-जालना आणि रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग या जागांवर देखील स्थानिक बंडखोरीमुळे अटीतटीची लढत पाहायला मिळणार आहे. आगामी चार जूनला उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी लढतींचे चित्र स्पष्ट होणार आहे.

## व्यावसायिक गॅस महागला; घरगुती सिलेंडर दर जैसे थे

वृत्तसंस्था। **नवी दिल्ली**

अमेरिका आणि इराणमधील संघर्षामुळे निर्माण झालेल्या तेल-गॅस संकटाचा परिणाम एलपीजीच्या किमतीवर जाणवू लागला आहे. सर्वसामान्य ग्राहकांना महागाईचा फटका बसू नये म्हणून सरकारने उत्पादनात वाढ करणे आणि बुकिंगच्या नियमांमध्ये बदल करणे यांसारखी पावले उचलली आहेत. मात्र, दुसरीकडे कमर्शियल एलपीजी सिलेंडरवर महागाईचा बॉम्ब सतत फुटत असून, जानेवारीपासून आतापर्यंत १९ किलोच्या कमर्शियल सिलेंडरच्या किमती जवळपास दुप्पट झाल्या आहेत. आज कमर्शियल सिलेंडरच्या किमती वाढवण्यात आल्या असून, पान २ वर

## तीन जिल्ह्यांत ८२ अधिकाऱ्यांच्या बदल्या

### नांदेड पोलीस परिक्षेत्रात मोठे प्रशासकीय फेरबदल

प्रतिनिधी। **नांदेड**

नांदेड पोलीस परिक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर प्रशासकीय फेरबदल करण्यात आला असून पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी ८२ पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. नांदेड, परभणी, लातूर आणि हिंगोली या चार जिल्ह्यांमध्ये करण्यात आलेल्या या बदल्यांमुळे पोलीस प्रशासनात नव्या जबाबदाऱ्यांचे वाटप झाले आहे. काही अधिकाऱ्यांना एका वर्षाची स्थगिती देण्यात आली असून काहींना त्यांच्या विनंतीनुसार बदली मंजूर करण्यात आली आहे.

या आदेशानुसार परभणी येथील पोलीस निरीक्षक पांडुरंग गवते यांची नांदेड येथे बदली करण्यात आली आहे. तर नांदेडचे जगन पवार, परभणीचे दीपक दंतुलवार आणि लातूरचे सुधाकर बावकर या पोलीस निरीक्षकांना बदलीतून स्थगिती देण्यात आली आहे. सहायक पोलीस निरीक्षकांच्या बदल्यांमध्ये नांदेड जिल्ह्यातील महादेव पुरी, संजय निलपत्रेवार, संकेत दिघे, उमाकांत पुणे, हनुमंत मिटके, वसंत आरसेवार, श्रीमती कमल शिंदे, रामकृष्ण पाटील, पांडुरंग माने आणि उमेश भोसले यांची विविध जिल्ह्यांत बदली झाली पान २ वर

**जेईई ॲडव्हान्स** — **३० हून अधिक विद्यार्थ्यांचा टॉप आयआयटीकडे मार्ग मोकळा**

# नांदेडचे कोनाळे आयआयटी सेंटर अव्वल

प्रतिनिधी। **नांदेड**

देशातील सर्वात प्रतिष्ठित आणि कठीण मानल्या जाणाऱ्या जेईई ॲडव्हान्स २०२६ परीक्षेचा निकाल जाहीर होताच नांदेडच्या कोनाळे आयआयटी सेंटरने पुन्हा एकदा आपल्या गुणवत्तेची छाप उमटवली आहे. यंदा संस्थेच्या ३० हून अधिक विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत देशातील नामांकित आयआयटी संस्थांमध्ये प्रवेश मिळविण्याचा मार्ग मोकळा केला आहे. तसेच आयआयआयटी, एनआयटी आणि इतर अग्रगण्य अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्येही प्रवेशाच्या संधी निर्माण झाल्या पान २ वर



**पूर्वी नांदेड हे मुख्यत :** नीट परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांसाठी ओळखले जात होते. मात्र, गेल्या चार वर्षांपासून जेईई मेन आणि जेईई ॲडव्हान्ससाठी सुरू असलेल्या दर्जेदार मार्गदर्शनामुळे शहरात आयआयटी प्रवेशाचा एक वेगळा आणि यशस्वी पॅटर्न तयार झाला आहे. आज नांदेडमधील विद्यार्थी देशातील सर्वोच्च आयआयटी संस्थांमध्ये प्रवेश मिळवत असून, अभियांत्रिकी क्षेत्रातही शहराची स्वतंत्र ओळख निर्माण होत आहे. यंदाचा निकाल हा त्याच सातत्यपूर्ण प्रयत्नांचा आणि विद्यार्थ्यांच्या मेहनतीचा परिणाम आहे.

**प्रा. व्ही. डी. कोनाळे** (संचालक कोनाळे क्लासेस, नांदेड)

## सुवेंदू अधिकारींच्या मंत्रिमंडळाचा विस्तार

वृत्तसंस्था। **कोलकाता**

पश्चिम बंगालमधील सुवेंदू अधिकारी सरकारच्या मंत्रिमंडळाचा आज विस्तार करण्यात आला. शपथविधी सोहळ्यात भाजपाच्या ३५ आमदारांनी मंत्रीपदाची शपथ घेतली. या विस्तारानंतर राज्यातील एकूण मंत्र्यांची संख्या ४१ झाली आहे. २९४ सदस्यांच्या पश्चिम बंगाल विधानसभेत जास्तीत जास्त ४४ मंत्री असू शकतात, त्यानुसार भाजपा सरकारमध्ये अजूनही तीन मंत्रीपदे रिक्त आहेत. आज १३ कॅबिनेट मंत्र्यांव्यतिरिक्त ३ राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) आणि १९ राज्यमंत्र्यांचा समावेश आहे. मंत्रिमंडळात सामील करण्यात आलेल्या नावांमध्ये सर्वात आश्चर्यकारक नाव पान २ वर

### ९२ गुण मिळवणारे समुपदेशनास पात्र

# जेईईत शुभम कुमार देशात, तर मुलींमध्ये आरोही टॉपर

वृत्तसंस्था। **नवी दिल्ली**





भारत आणि जागतिक स्तरावर अभियांत्रिकी प्रवेश परीक्षांमधील सर्वात प्रतिष्ठित आणि कठीण परीक्षांपैकी एक मानल्या जाणाऱ्या संयुक्त प्रवेश परीक्षेचा (जेईई ॲडव्हान्स्ड २०२६) निकाल आज जाहीर करण्यात आला. यंदा ही परीक्षा आयआयडी रुडकीद्वारे आयोजित करण्यात आली होती. आयआयटी दिल्ली झोनच्या तीन उमेदवारांनी कॉमन रँक लिस्टमध्ये टॉप तीन रँक पटकावल्या आहेत. यात आयआयटी दिल्ली झोनच्या शुभम कुमारने ऑल इंडिया रँकमध्ये प्रथम स्थान मिळवले आहे. तर मुलींमध्ये आरोही देशपांडे देशपातळीवर पहिली आली आहे.

अधिकृत प्रसिद्धीपत्रकानुसार शुभम कुमारने ३६० पैकी ३३० गुण मिळवून पहिला क्रमांक पटकावला आहे. तर कबीर छिल्लर आणि जतीन चाहर या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे दुसरा आणि तिसरा क्रमांक पटकावला आहे. आज पहाटे दोनच्या सुमारास निकाल जाहीर करण्यात आला. पान २ वर

# जीएसटी संकलनात वाढ ! सरकारी तिजोरीत आले १.९४ लाख कोटी ; महाराष्ट्राचा मोठा वाटा

वृत्तसंस्था | नवी दिल्ली

वस्तू आणि सेवांचा उत्तम पुरवठा, तसेच आयातीमधून होणाऱ्या कर संकलनात सातत्याने होणाऱ्या वाढीमुळे मे महिन्यात एकूण जीएसटी संकलन ३.२ टक्क्यांनी वाढले आहे. या वाढीसह मे महिन्याचा जीएसटी संकलनाचा आकडा १.९४ लाख कोटी रुपयांच्या पार गेला आहे.

गेल्यावर्षी, म्हणजेच मे २०२५ मध्ये हे संकलन १.८८ लाख कोटी रुपये इतके होते. मात्र, एप्रिल महिन्यातील ऐतिहासिक विक्रमी संकलनाच्या तुलनेत मे महिन्याचा वेग काहीसा मंदावला आहे. यावर्षी एप्रिलमध्ये २.४२ लाख कोटी रुपयांचा विक्रमी जीएसटी जमा झाला होता, जे मे महिन्याच्या तुलनेत बरेच जास्त आहे.

जीएसटी महासंचालनालयाने सोमवारी जारी केलेल्या आकडेवारीनुसार, वस्तू आणि सेवांच्या पुरवठ्यात झालेली सुधारणा तसेच आयातीवरील कर संकलनात सातत्याने झालेली वाढ यामुळे जीएसटी महसूल संकलनात ही वाढ झाली आहे. आकडेवारीनुसार, मे महिन्यात देशांतर्गत व्यवहारांमधून केंद्रीय जीएसटी (सीजीएसटी) संकलन ३७,३९७ कोटी, राज्य जीएसटी (एसजीएसटी) ४५,१४३ कोटी रुपये आणि एकात्मिक जीएसटी




(आयजीएसटी) ५१,९९० कोटी रुपये इतके राहिले. आकडेवारीनुसार, या कालावधीत करपात्र वस्तूंच्या पुरवठ्यात २६.९ टक्क्यांची वाढ नोंदवली गेली, जी देशांतर्गत मागणीचे प्रतिबिंब दर्शवते. सेवा क्षेत्रात ही वाढ २२.२ टक्के राहिली असून, ती देशांतर्गत उपभोगातील मजबुती दर्शवते. त्याचप्रमाणे, आयातीमधून मिळणारे आयजीएसटी संकलन १९.१ टक्क्यांनी वाढून मे महिन्यात ५९,६५४ कोटी रुपये झाले, जे औद्योगिक क्षमतेच्या विस्ताराचे संकेत मानले जात आहेत. याशिवाय, या कालावधीत जीएसटी परतावा (रिफंड) २.६ टक्क्यांनी वाढून २७,२८१ कोटी रुपये झाला. परताव्याचे समायोजन केल्यानंतर मे महिन्यात निव्वळ जीएसटी महसूल संकलन ३.३ टक्क्यांनी वाढून सुमारे १.६७ लाख कोटी रुपये राहिले. यापूर्वी एप्रिल महिन्यात जीएसटी महसूल संकलन ८.७ टक्क्यांनी वाढून २.४३ लाख कोटी रुपयांच्या विक्रमी उच्चांकावर पोहोचले होते. सेवा क्षेत्रातील करपात्र व्यवहारांमध्ये २२.२ टक्के वाढ नोंदवली गेली. यामुळे देशांतर्गत अर्थव्यवस्थेतील खप आणि व्यावसायिक व्यवहारांमध्ये स्थिरता कायम असल्याचे चित्र समोर आले आहे. तर आयातीमधील वाढ औद्योगिक उत्पादनासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाची आणि भांडवली वस्तूंची वाढती आयात दर्शवते. त्यामुळे उत्पादन क्षमता विस्ताराच्या प्रक्रियेला गती मिळत असल्याचे संकेत मिळतात. परतावे वजा केल्यानंतर सरकारला मिळालेला निव्वळ महसूल ३.३ टक्क्यांनी वाढल्याने महसूल वाढीचा कल कायम असल्याचे दिसून येते. आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या दोन महिन्यांत (एप्रिल-मे) जीएसटी महसुलात सातत्यपूर्ण वाढ नोंदवली गेली आहे.

### राज्यनिहाय महसुलात मिश्र चित्र

राज्यांच्या जीएसटी महसुलात वेगवेगळे ट्रेंड दिसून आले. वाढ नोंदवणाऱ्या प्रमुख राज्यांत कर्नाटक : ११ टक्के वाढ, महाराष्ट्र : ८, आंध्र प्रदेश : ११, उत्तर प्रदेश : ९, केरळ : १९, गुजरात : तीन टक्के वाढ नोंदवण्यात आली आहे. तर घसरण नोंदवणाऱ्या राज्यांत दिल्ली : ३६ टक्के घट, तामिळनाडू : किरकोळ घट, राजस्थान : किरकोळ घट आहे. सेटलमेंट झाल्यानंतर राज्यांच्या महसुलात आणखी चांगली वाढ दिसून आली. यात हरियाणा : २२ टक्के वाढ, कर्नाटक : १७, गुजरात : १६, आंध्र प्रदेश : १६, केरळ : १५, तेलंगणा : १४ टक्के वाढ. दिल्लीमध्ये सेटलमेंटनंतरही महसूल २६ टक्क्यांनी घसरला, त्यामुळे राजधानीतील कर संकलनाबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत, असे तज्ज्ञांचे मत आहे.

## संक्षिप्त

### अभिजित दीपके यांचे दिल्लीत आंदोलन

**नवी दिल्ली :** नीट परीक्षा पेपर लीक प्रकरणामुळे विद्यार्थ्यांमध्ये संताप पाहायला मिळत आहे. याच पार्श्वभूमीवर, सोशल मिडियावरील प्रसिद्ध व्यंगात्मक पेज 'कॉक्रोच जनता पार्टी' चे संस्थापक अभिजीत दीपके देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी येत्या सहा जून रोजी भारतात परतणार असून, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलन करणार आहेत. अभिजीत दीपके यांनी इन्स्टाग्रामवर एक व्हिडिओ शेअर करत या आंदोलनाची माहिती देताना शनिवारी आपण भारतात येणार असल्याचे म्हटले आहे.

### गंगापूरच्या दोन तरुण क्रिकेटपटूंचा मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर :** लेह-लडाखच्या रम्य सफरीची स्वप्ने डोळ्यांत साठवत गंगापूर आणि महालगाव परिसरातील चार मित्र रविवारी रात्री निघाले होते. मात्र, नियतीने त्यांच्या आयुष्याला वेगळेच वळण दिले. मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावरे झालेल्या अपघातात दोन युवा क्रिकेटपटू काळाच्या पडद्याआड गेले, तर अन्य दोघेजण जखमी झाले. या अपघातात महालगाव (ता. वैजापूर) येथील बद्रीनाथ ऊर्फ बद्री प्रमोद नांगरे (वय २६) यांचा मृत्यू झाला, तर गंगापूर येथील अनिकेत अनिल काळे (वय २९) यांची मृत्यूशी सुरू असलेली झुंज उपचारादरम्यान अपयशी ठरली.

### कारखान्यात वायू गळती ; तिघांचा मृत्यू

**चंदीगढ :** पंजाबमधील लुधियाना येथे सोमवारी एका कारखान्यातील वायू गळतीमुळे बाप-लेकासह तीन कामगारांचा मृत्यू झाला. तर, अन्य दोन जणांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हे सर्व कामगार कारखान्यात साफसफाईचे काम करण्यासाठी गेले असता काळाने त्यांच्यावर घाला घातला. कारखान्यातील सांडपाणी वाहिनी साफ करण्यासाठी काही कामगारांना बोलावण्यात आले. साफसफाईचे काम सुरू असताना विषारी वायू गळती झाली आणि सर्व कामगारांना श्वासोच्छवासाचा त्रास होऊ लागला. यातील तिघांना घटनास्थळीच मृत्यू झाला आणि दोन बेशुद्ध झाले.

### बॅनर्जी हल्लाप्रकरणी सहा जणांना अटक

**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये खा. अभिषेक बॅनर्जी यांच्यावर झालेले हल्ल्याचे प्रकरण ताजे असतानाच खा. कल्याण बॅनर्जी यांच्यावरही हल्ला झाला. अभिषेक बॅनर्जींच्या हल्ला प्रकरणी पोलिसांनी आधी पाच जणांना अटक केली होती. त्यानंतर या प्रकरणात सहावी अटक झाल्याची माहिती समोर आली. सर्व आरोपी स्थानिक रहिवासी असून त्यांनी सोनारपूर येथे अभिषेक बॅनर्जी यांच्या दौऱ्यादरम्यान त्यांना विरोध केला होता. या घटनेनंतर नोंदवण्यात आलेल्या तक्रारीच्या आधारे सोनारपूर पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपींना ताब्यात घेतले आहे, असे पोलिसांनी सांगितले.

## परीक्षा यंत्रणा दबावात, सध्या पद्धत बदलणे शक्य नाही

# नीट पुनर्परीक्षा संगणकावर घेण्यास सुप्रीम कोर्टाचा नकार

वृत्तसंस्था | नवी दिल्ली

येत्या २१ जून रोजी होणारी नीट-यूजी २०२६ ची पुनर्परीक्षा सध्याच्या लेखी (पेन-अँड-पेपर) पद्धतीऐवजी संगणकाधारित (सीबीटी) पद्धतीने घेण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली. न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि न्यायमूर्ती अरविंद कुमार यांच्या खंडपीठासमोर राष्ट्रीय जनता दलाचे (राजद) खा. सुधाकर सिंह यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी झाली. याचिकाकर्त्यांच्या वतीने उपस्थित वकिलांनी इतर सर्व मागण्या बाजूला ठेवून केवळ पुनर्परीक्षा सीबीटी पद्धतीने घेण्याची मागणी असल्याचे न्यायालयाला सांगितले.

देशभरात तीन मे रोजी झालेली नीट-यूजी परीक्षा प्रश्नपत्रिका फुटल्याचा संशय निर्माण झाल्यानंतर रद्द करण्यात आली होती. त्यानंतर दाखल करण्यात आलेल्या या याचिकेत नीट परीक्षा पूर्णपणे संगणकाधारित पद्धतीने घेण्यासाठी कालबद्ध आराखडा तयार करण्याची मागणी करण्यात आली होती. याशिवाय, विद्यमान एनटीएच्या जागी तांत्रिक सुरक्षाव्यवस्था, जबाबदारीची स्पष्ट यंत्रणा आणि स्वतंत्र देखरेखीची व्यवस्था असलेली वैधानिक राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरण स्थापन करण्याची मागणी याचिकेत करण्यात आली होती. त्यानंतर आज न्यायालयात यावर सुनावणी झाली. परीक्षा रद्द झाली असून तिचे पुन्हा आयोजन करण्यात येत आहे. अशा परिस्थितीत संबंधित यंत्रणांवर मोठा ताण आहे. या टप्प्यावर अशा प्रकारचा आदेश देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे न्यायमूर्ती नरसिंहा यांनी स्पष्ट केले. याचिकाकर्त्यांनी केवळ सीबीटी पद्धतीची मागणी कायम असल्याचे पुन्हा नमूद केल्यानंतरही न्यायालयाने तत्काळ सुनावणी घेण्यास नकार दिला आणि प्रकरण सुट्टीनंतर घेण्यात येईल, असे स्पष्ट केले. ही याचिका एनटीएमध्ये सुधारणा करण्यासंदर्भातील इतर प्रलंबित याचिकांसोबत जोडण्यात आली आहे.




### पेपरफुटी थांबविण्यासाठी विनंती

प्रश्नपत्रिकांचे एन्क्रिप्टेड डिजिटल प्रसारण, बायोमेट्रिक पडताळणी, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित देखरेख, अधिक सक्षम सायबर सुरक्षा व्यवस्था, प्रश्नपत्रिकांचे 'डिजिटल लॉकिंग' तसेच पेपरफुटी प्रकरणातील आरोपी, मध्यस्थ, कोचिंग संस्था आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर फौजदारी कारवाई करण्याचे निर्देश देण्याची विनंती याचिकेत करण्यात आली आहे.

## सईद खान आणि डॉ. विवेक नावंदर यांच्यात लढत

# दोन निष्ठावंत शिवसैनिकांत परभणी-हिंगोलीत सामना !

वृत्तसंस्था | परभणी

स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधानपरिषदेवर निवडून द्यायच्या परभणी-हिंगोली मतदारसंघातून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने मुस्लिम चेहऱ्याला उमेदवारी दिली आहे. त्यामुळे आता येथील लढत लक्षवेधी झाली आहे. आता शिवसेनेचे सईद खान तर उद्धव ठाकरे गटाकडून डॉ. विवेक नावंदर मैदानात आहेत.

महाविकास आघाडीमध्ये परभणी-हिंगोलीची जागा उबाठाला सुटली आणि या पक्षाने निष्ठावंत शिवसैनिक डॉ. वेक नावंदर यांना उमेदवारी जाहीर केली. तर महायुतीमध्ये ही जागा कोणत्या पक्षाला सुटेल याचा सस्पेन्स संपल्यानंतर आज अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी शिवसेनेने पक्षाच्या अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष तथा परभणीचे जिल्हाध्यक्ष सईद खान यांना उमेदवारी जाहीर केली आहे. येथून शिवसेनेकडून माजी आ. विप्लव बाजोरिया, जिल्हाप्रमुख सईद खान, जिल्हाप्रमुख आनंद भरोसे, हिंगोलीचे जिल्हाप्रमुख कदम, तसेच माजी मंत्री अर्जुन खोतकर यांचे सुपुत्र इच्छुक होते. त्यामुळे बंडखोरी टाळण्यासाठी आज उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी शिवसेनेकडून सईद खान यांना उमेदवारी दिली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक मुस्लिम तरुण चेहरा रिंगणात उतरवून शिवसेना ही मुस्लिमविरोधी नसल्याचा स्पष्ट संदेश दिला आहे. भाजपासोबत असून आम्ही हिंदुत्व प्रखरतेने मांडत असलो तरी मुस्लिमविरोधी नसल्याचे यामधून स्पष्ट होत आहे. सईद खान हे शिवसेनेचे अल्पसंख्यांक विभागाचे प्रदेशाध्यक्ष आहेत. तसेच परभणी जिल्हाप्रमुखपदाची देखील जबाबदारी त्यांच्यावर आहे.



### कोण आहेत सईद खान ?

सईद खान हे १५ वर्षांपासून एकनाथ शिंदे यांचे कट्टर समर्थक आहेत. राज्यातील विविध पालिका, महापालिका आणि जिल्हा परिषदांमधील सुमारे ९०० अल्पसंख्याक लोकप्रतिनिधींना शिवसेनेत प्रवेश देण्यात त्यांचा महत्वाचा वाटा राहिला आहे. अलीकडे झालेल्या पालिका निवडणुकीत पाथरी पालिकेवर शिवसेनेची सत्ता मिळवली पाथरी नगराध्यक्ष आणि नऊ नगरसेवक तर सोनपेठमध्ये आघाडी करून नगराध्यक्ष तसेच १० आणि मानवतमधील पाच नगरसेवक निवडून आणले. जिल्हा परिषद निवडणुकीत पाथरी विधानसभा मतदारसंघातून दोन जिल्हा परिषद सदस्य आणि चार पंचायत समिती सदस्य निवडून आणण्यासाठी योगदान दिले. पाथरी बाजार समितीमध्ये नऊ संचालक निवडून आणले.

# नीट पेपरफुटीचा मास्टरमाईंड कुलकर्णीच्या घरावर हातोडा ; अनधिकृत बांधकाम पाडले

वृत्तसंस्था | बीड

देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या नीट पेपरफुटीप्रकरणात सीबीआयने कारवाईचा धडाका लावत महाराष्ट्रातील नाशिक, पुणे, लातूर, बीडमधून अनेकांना अटक केली आहे. याप्रकरणी, सीबीआयकडून आरोपींची कसून चौकशी सुरू असून काही आरोपींना आता न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले आहेत. मात्र, याप्रकरणात पेपरफुटीचा मास्टरमाईंड असलेल्या पी. व्ही. कुलकर्णी याच्यावर प्रशासनाने तोडक-मोडक कारवाई सुरू केली आहे. बीड शहरातील शाहूनगर भागात सुरू असलेल्या कुलकर्णीच्या बांधकामावर अखेर हातोडा मारण्यात आला आहे.

नगरपालिका प्रशासनाने हे बांधकाम संबंधित ठेकेदाराने स्वतः पाडून घ्यावे यासाठी नोटीस बजावली होती. मात्र, प्रशासनाच्या या नोटीसीची मुदत आज संपल्यानंतर अनधिकृत बांधकामावर हातोडा चालवला जात आहे. विशेष म्हणजे स्वतः संबंधित ठेकेदाराकडून अनधिकृत असलेले बांधकाम पाडले जात आहे. देशभरात गाजत असलेल्या आणि देशभरातून संताप व्यक्त होत असलेल्या, २२ लाख विद्यार्थ्यांच्या भविष्याचा खेळ करणाऱ्या नीट पेपरफुटीच्या घोटाळ्यात सेवानिवृत्त प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णीचे नाव आले होते, त्यानंतर सीबीआयने त्याला अटक केली. याप्रकरणी, कारवाईला वेग आला असून पी. व्ही. कुलकर्णी मूळ बीडमधील असून त्याचे शहरातील शाहूनगर भागात चार मजली इमारतीचे बांधकाम सुरू असल्याचे समोर आले होते. त्यानंतर, या बांधकामातील अवैधतेबाबात पालिका प्रशासनाकडून नोटीस बजावल्यानंतर हे पाडकाम केले जात आहे.

## पान एकवरून

**राज्यातील विधानपरिषदेच्या...**

पातळीवरील अडचणींवर कशा प्रकारे मात करायची, याचे उत्तम कौशल्य राजूरकर यांच्याकडे आहे. त्यांच्या याच दांडग्या जनसंपर्काचा आणि अनुभवाचा फायदा पक्षाला नक्की होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. अमरनाथ राजूरकर यांच्याकडे असलेल्या नेतृत्व कौशल्याच्या जोरावर ही निवडणूक आपल्याला एकतर्फी जिंकायची आहे, असा विश्वास खा. चव्हाण यांनी व्यक्त केला. पक्षाच्या सर्व लोकप्रतिनिधींनी, पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन राजूरकर यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन खा. चव्हाण यांनी केले. या बैठकीला महायुतीचे प्रमुख नेते, नगरसेवक आणि मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या बैठकीनंतर अत्यंत उत्साही वातावरणात अमरनाथ राजूरकर यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला.

**आनंदऋतू अखेर केरळमध्ये...**

भारतातील लाखो लोक केरळमध्ये दरवर्षी होणाऱ्या नैऋत्य मान्सूनच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहत असतात आणि अखेर त्यांची ही प्रतीक्षा संपली आहे. हवामान विभागाने आज मान्सून केरळच्या किनारपट्टीवर दाखल झाल्याचे जाहीर केले ; यामुळे उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला. या घोषणेसोबतच विभागाने येत्या काही दिवसांत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता व्यक्त केली आहे. भारतातील मान्सूनच्या प्रगतीवर देशभरातून बारकाईने लक्ष ठेवले जाते ; कारण केरळमधील मान्सूनचे आगमन हा उर्वरित देशात त्याच्या पुढील वाटचालीसाठी एक महत्त्वाचा निकष मानला जातो.

**दोन आमदार...**

राज्य विधानसभेतील बनावट सही प्रकरणी या दोघांनी तक्रार दाखल केल्याचे सांगितल्यानंतर काही मिनिटांतच या आमदारांना पक्षातून काढून टाकण्याचा आदेश आला. दरम्यान, विधानसभेत तृणमूल काँग्रेसने विरोधी पक्षनेते म्हणून शोभनदेव चट्टोपाध्याय यांना पाठिंबा दिला होता. तृणमूल काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी यांनी विधानसभा सचिवालयाला विविध पदांसाठी पक्षाच्या उमेदवारीचा प्रस्ताव देणारे पत्र पाठवल्यावर या वादाला सुरुवात झाली. या पत्रात शोभनदेव चट्टोपाध्याय यांची विरोधी पक्षनेतेपदी, नयना बंडोपाध्याय आणि आसिमा पात्रा यांची उपनेतेपदी, तर कोलकाताचे महापौर फिरहाद हकीम यांची मुख्य प्रतोदपदी नियुक्ती करण्याचा प्रस्ताव होता. या प्रस्तावावर विधानसभा अध्यक्ष रतींद्र बोस यांनी तृणमूल काँग्रेस आमदारांच्या सह्यांची यादी मागवली होती. चौकशीदरम्यान, काही सह्यांमध्ये कथित विसंगती आढळून आल्या. याशिवाय, सह्यांच्या सत्यतेबद्दल प्रश्न उपस्थित झाल्यानंतर, तपास सीआयडीकडे सोपवण्यात आला आहे.

**विधानपरिषदेत महायुती विरुद्ध...**

अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी खरे चित्र स्पष्ट होणार आहे.महायुतीमध्ये भाजपा ११, शिवसेना चार, तर राष्ट्रवादी काँग्रेस दोन जागा लढवत आहे. दुसरीकडे महाविकास आघाडीत काँग्रेस सर्वाधिक आठ, ठाकरेंची शिवसेना सहा आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीने तीन मतदारसंघात उमेदवार दिले आहेत. एकूण १६ ठिकाणी निवडणूक तर नागपूरमध्ये पोटनिवडणूक होत आहे. राज्यातील १७ मतदारसंघातील प्रमुख उमेरवार असे आहेत : सोलापूर : काँग्रेस मविआचे आदित्य फत्तेपूरकर विरुद्ध भाजपा महायुतीचे राजेंद्र राऊत, अहिल्यानगर - काँग्रेस मविआचे करण ससाणे विरुद्ध भाजपा महायुतीचे प्राजक्त तनपुरे, ठाणे : शरद पवार गटाचे मविआचे अभिजीत पवार विरुद्ध शिवसेना महायुतीचे रवींद्र फाटक, जळगाव : शिवसेना ठाकरे मविआचे शरद तायडे विरुद्ध भाजपा महायुतीचे नंदकिशोर महाजन, सांगली-सातारा : शरद पवार गट मविआचे बाळासाहेब पाटील/अभयसिंह जगताप विरुद्ध भाजपाचे धैर्यशील माने, नांदेड : भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे अमरनाथ राजूरकर विरुद्ध काँग्रेस मविआचे रामदास पाटील, यवतमाळ : काँग्रेस मविआचे साहेबराव कांबळे विरुद्ध शिवसेना महायुतीचे दुष्यंत चतुर्वेदी, पुणे : शरद पवार गट मविआचे श्रीकांत पाटील विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे विक्रम काकडे, भंडारा-गोंदिया : काँग्रेस मविआचे दिलीप बनसोड विरुद्ध भाजपा महायुतीचे अविनाश ब्राह्मणकर, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग : शिवसेना ठाकरे गट सुरेंद्रनाथ उर्फ बाळा माने विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे अनिकेत तटकरे, नाशिक : मविआचा उमेदवार नाही, अपक्ष विरुद्ध शिवसेना महायुतीचे नरेंद्र दराडे, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली : काँग्रेस मविआचे शैलेश अग्रवाल विरुद्ध भाजपा महायुतीचे अरुण लखानी, अमरावती : काँग्रेस मविआचे हर्षदीप देशमुख विरुद्ध भाजपा महायुतीचे प्रवीण पोटे, धाराशिव-लातूर-बीड : काँग्रेस मविआचे महेश देशमुख विरुद्ध भाजपा महायुतीचे बसवराज पाटील, परभणी-हिंगोली : शिवसेना ठाकरे गट मविआचे डॉ. विवेक नावंदर विरुद्ध शिवसेना महायुतीच सईद खान, छत्रपती संभाजीनगर-जालना : शिवसेना ठाकरे गट देवयाणी डोणगावकर विरुद्ध भाजपा सुहास शिरसाट आणि नागपूर (पोटनिवडणूक) : काँग्रेस मविआचे अतुल लोंढे विरुद्ध भाजपा महायुतीचे डॉ. राजीव पोतदार अशा लढती होत आहेत.

**व्यावसायिक गॅस महागला...**

दिल्लीत प्रति सिलेंडर ४२ रुपयांची वाढ झाली आहे. आधीच गॅसच्या तुटवड्याचा सामना करणाऱ्या हॉटेल, रेस्टॉरंट आणि इतर व्यावसायिकांवर या दरवाढीमुळे अतिरिक्त आर्थिक बोजा पडणार आहे. तेल कंपन्यांनी १४ किलोच्या घरगुती एलपीजी सिलेंडरच्या किमतीत कोणताही बदल न केल्याने गृहिणींचे बजेट मात्र स्थिर राहिले. यावर्षाच्या सुरुवातीपासून आतापर्यंत सलग सातव्यांदा कमर्शियल गॅस सिलेंडरच्या किमती वाढल्या आहेत. ऑईल मार्केटिंग कंपन्यांनी जूनच्या पहिल्याच दिवशी झटका देत १९ किलोच्या सिलेंडरच्या किमतीत दिल्ली ते कोलकाता दरम्यान ४२ रुपयांपासून ते ५३.५० रुपयांपर्यंत वाढ केली आहे. मागील वर्षाच्या अखेरीस म्हणजेच डिसेंबर २०२५ मध्ये दिल्लीत या सिलेंडरची किंमत १५८०.५० रुपये होती, जी एक जून रोजी थेट ३,११३.५० रुपयांवर पोहोचली आहे. एकीकडे व्यावसायिक गॅस महाग होत असताना सर्वसामान्यांना दिलासा मिळाला आहे. १४ किलोच्या घरगुती गॅस सिलेंडरच्या किमतीत शेवटचा बदल ७ मार्च रोजी करण्यात आला होता, तेव्हापासून हे दर स्थिर आहेत.

**तीन जिल्ह्यांत ८२ अधिकाऱ्यांच्या...**

आहे. परभणी जिल्ह्यातील बालाजी पुंड, मारुती कारवार, सुनील अंधारे, राम गीते, संजय चव्हाण आणि संदीप बोरकर यांनाही नव्या ठिकाणी नियुक्ती देण्यात आली आहे. लातूरमधील भाऊसाहेब खंदारे, भीमराव गायकवाड, ज्ञानदेव सानप आणि विठ्ठल दुरपडे यांच्याही बदल्या जाहीर करण्यात आल्या आहेत. दत्तात्रय मंटाळे, सुभाष माने, श्रीमती रेखा काळे, मंगेश नाईक आणि श्रीमती मेधा निंबाळकर या अधिकाऱ्यांना एक वर्षाची स्थगिती देण्यात आली असून ते सध्याच्याच ठिकाणी कार्यरत राहणार आहेत.

दरम्यान, सचिन गढवे, सूचिता शिंगाडे, सुधाकर चव्हाण, सुप्रिया केंद्रे, वसंत मुळे आणि रामदास नीरदोडे या सहायक पोलीस निरीक्षकांना त्यांच्या विनंतीनुसार बदली देण्यात आली आहे. याशिवाय नांदेड परिक्षेत्रातील ४० पोलीस उपनिरीक्षकांच्या बदल्यांचाही आदेश जारी करण्यात आला आहे. नांदेड, परभणी, लातूर आणि हिंगोली जिल्ह्यांतील अनेक अधिकाऱ्यांची परस्पर जिल्ह्यांमध्ये बदली करण्यात आली असून काहींना एक वर्षाची स्थगिती देण्यात आली आहे. तसेच सात पोलीस उपनिरीक्षकांना विनंतीनुसार बदली मंजूर करण्यात आली आहे. बदली झालेल्या सर्व अधिकाऱ्यांना संबंधित पोलीस अधीक्षकांनी तात्काळ कार्यमुक्त करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. निर्धारित मुदतीत नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर न राहणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा आदेशात देण्यात आला आहे.

**जेईईत शुभम कुमार देशात...**

कबीर छिल्लरने ३६० पैकी ३२९ गुण तर जतीनने ३१९ गुण मिळवले आहेत. आरोही देशपांडेने २८० गुण मिळवले. या परीक्षेसाठीच्या पात्रतेच्या कट-ऑफमध्ये (किमान गुणांच्या मर्यादेत) लक्षणीय वाढ दिसून आली; मागील वर्षाच्या (२०२५) तुलनेत यात १८ गुणांची वाढ होऊन हा कट-ऑफ ९२ गुणांवर पोहोचला आहे. याव्यतिरिक्त सामान्य प्रवर्गासाठी विषयनिहाय कट-ऑफ ८ गुण इतका निश्चित करण्यात आला होता. हे पात्रतेचे निकष पूर्ण करणारे एकूण ५६,८८० विद्यार्थी पात्र म्हणून घोषित करण्यात आले आहेत. थोडक्यात सांगायचे तर याचा अर्थ असा, की एकूण ३६० गुणांपैकी ९२ गुण मिळवणारा कोणताही विद्यार्थी ज्याने भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित या तीनही विषयांमध्ये स्वतंत्रपणे प्रत्येकी आठपेक्षा अधिक गुण मिळवले आहेत, त्याला समुपदेशनासाठी पात्र घोषित करण्यात आले आहे. हे विद्यार्थी आता आयआयटीमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी समुपदेशन प्रक्रियेत सहभागी होण्यास पात्र ठरतील. यावर्षी जेईई ॲडव्हान्स्डसाठी एकूण १ लाख ८७ हजार ३८९ अर्ज आले होते. तर परीक्षेला १ लाख ७९ हजार ६९४ विद्यार्थी उपस्थित राहिले होते. परीक्षेत बसलेल्या उमेदवारांपैकी ५६ हजार ८८० उमेदवार उत्तीर्ण झाले आहेत. या ५६ हजार ८८० उमेदवारांमध्ये १० हजार १०७ विद्यार्थिनींचा समावेश आहे.

**सुवेंदू अधिकारींच्या...**

कलिता माझी यांचे आहे. त्यांचा जीवनप्रवास अत्यंत संघर्षमय राहिला आहे. राजकारणात येण्यापूर्वी कलिता लोकांच्या घरी भांडी घासण्याचे (मोलकरीण) काम करायच्या. तर त्यांचे पती प्लंबर म्हणून काम करतात. याशिवाय क्रिकेटपटू अशोक दिंडा यांना राज्यमंत्री करण्यात आले आहे. तसेच पत्रकारितेतून राजकारणात आलेल्या स्वपन दासगुप्ता आणि जगन्नाथ चट्टोपाध्याय या दोन आमदारांनाही मंत्रीपद देण्यात आले आहे. तसेच महिलांनाही स्थान देण्यात आले आहे.

**नांदेडचे कोनाळे आयआयटी...**

आहेत. देशभरातील लाखो विद्यार्थ्यांपैकी मोजक्याच विद्यार्थ्यांना जेईई ॲडव्हान्समध्ये यश मिळते. अशा अत्यंत स्पर्धात्मक परीक्षेत कोनाळे आयआयटी सेंटरच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश विशेष कौतुकास्पद ठरले आहे. संस्थेच्या विद्यार्थ्यांपैकी विनायक कदमने ऑल इंडिया रँक (एआयआर) १२०८ आणि ओबीसी रँक २०५ मिळवत सर्वोत्कृष्ट कामगिरी केली. प्रथमेश तांदळे (एआयआर १८२४, ओबीसी ३३१), कन्हैया पतंगे (एआयआर २५९९, ओबीसी ४९८), गौरव बरडे (एआयआर ३१७७, ओबीसी ६३८), वरद बोडावर (एआयआर ३४९०, ओबीसी ७०६), आदित्य खाकरे (एआयआर ३९३७, ओबीसी ८२९), अमित जाधव (एआयआर ४४४६, ओबीसी ९३५), कृष्ण पांचाळ (एआयआर ७४९१, ओबीसी १७०४), सायली भोंगे (ईडब्ल्यूएस रँक ९१३) आणि स्वराज कदम (एआयआर ७७६३, ईडब्ल्यूएस ९५२) यांनीही उल्लेखनीय यश मिळवत संस्थेच्या लौकिकात भर घातली. विशेष म्हणजे अजिंक्य पगलवाड याने अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात देशात २१ वी रँक प्राप्त करून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्याच्या या यशामुळे संस्थेच्या निकालाला आणखी एक मानाचा तुरा मिळाला आहे. या निकालामुळे नांदेडसारख्या शहरातील विद्यार्थीही राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत यशस्वी ठरू शकतात, हे पुन्हा अधोरेखित झाले आहे. सातत्यपूर्ण गुणवत्ता, संकल्पनाधारित अध्यापन, नियमित चाचण्या, वैयक्तिक मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे बारकाईने मूल्यमापन ही संस्थेच्या यशामागील प्रमुख कारणे मानली जात आहेत.

संस्थेचे संचालक प्रा. कोनाळे यांनी सांगितले, की यंदाचा निकाल अत्यंत समाधानकारक आहे. ३० हून अधिक विद्यार्थी आयआयटीमध्ये प्रवेश मिळविण्याच्या स्थितीत असून अनेक विद्यार्थ्यांना आयआयआयटी, एनआयटी आणि इतर नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळणार आहे. विद्यार्थ्यांची मेहनत, पालकांचा विश्वास आणि शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन यामुळे हे यश शक्य झाले आहे. जेईई ॲडव्हान्सच्या या दमदार निकालामुळे कोनाळे आयआयटी सेंटरची नांदेडसह संपूर्ण राज्यात चर्चा असून, अभियांत्रिकी क्षेत्रात करिअर घडवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही संस्था विश्वासार्ह पर्याय म्हणून पुन्हा एकदा पुढे आली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत असून शैक्षणिक क्षेत्रातून त्यांचे कौतुक केले जात आहे.

## खरीप हंगाम जवळ आला अन् खत टंचाईने बळीराजा झाला हैराण

# खतासाठी शेतकऱ्यांची वणवण

प्रतिनिधी । नांदेड

खरिपाचा हंगाम अगदी तोंडावर आला आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी खते खरेदी करण्यासाठी लगबग सुरू केली ,परंतु मार्केटमध्ये डीएपी युरिया खत मिळेनासे झाले आहे. कृषी केंद्राकडून सदर खाते उपलब्ध नसल्याचे सांगितले जात आहे.तुलनेत पुरवठा होत नसल्याने, खरिपाच्या तोंडावर डीएपी आणि युरिया खतासाठी शेतकरी अडचणीत सापडल्याचे चित्र दिसत आहे .

खरिपात जिल्ह्यासाठी १ लाख १४ हजार २०० मेट्रिक टन विविध खतांचे आवंटन राज्याच्या कृषी आयुक्तालयामार्फत मंजूर करण्यात आले आहे, खरिपासाठी जिल्ह्यात शेतकऱ्यांकडून सर्वाधिक मागणी असलेल्या डीएपी आणि युरिया खताचा पुरेसा पुरवठा होत नाही.



### पर्यायी खते घेण्याचा सल्ला

जिल्ह्यातील खत विक्री केंद्रांमध्ये सद्यस्थितीत डीएपी व युरिया खत उपलब्ध नसल्याने, शेतकऱ्यांना हे खत मिळत नसून, पर्यायी खते घेण्याचा सल्ला दिला जात असल्याचे वास्तव आहे.जिल्ह्यात सद्यस्थितीत ४ हजार ३५९ मेट्रिक टन युरिया आणि १ हजार ४७५ मेट्रिक टन डीएपी खतसाठा उपलब्ध असल्याची माहिती अधिकृत सूत्राने दिली आहे शहरातील खते विक्री केंद्रांमध्ये ही खते उपलब्ध नसल्याचे वास्तव आहे.

त्यामुळे खते विक्री केंद्रांमध्ये संबंधित खतांचा साठा उपलब्ध नसल्याच्या परिस्थितीत पेरणी सुरू होण्यापूर्वीच जिल्ह्यातील शेतकऱ्यांना डीएपी आणि युरिया या खतांच्या तुटवड्याचा सामना करावा लागत आहे.

जिल्ह्यातील खत विक्री केंद्रांमध्ये सद्यस्थितीत डीएपी व युरिया खत उपलब्ध नसल्याने, शेतकऱ्यांना हे खत मिळत नसून, पर्यायी खते घेण्याचा सल्ला दिला जात असल्याचे वास्तव आहे.

जिल्ह्यात सद्यस्थितीत ४ हजार ३५९ मेट्रिक टन युरिया आणि १ हजार ४७५ मेट्रिक टन डीएपी खतसाठा उपलब्ध असल्याची माहिती अधिकृत सूत्राने दिली आहे शहरातील खते विक्री केंद्रांमध्ये ही खते उपलब्ध नसल्याचे वास्तव आहे.

५०० मेट्रिक टन डीएपी आणि दोन दिवसांत आणि १ हजार ३०० मेट्रिक टन युरिया खताचा साठा येत्या पाच दिवसांत जिल्ह्यात उपलब्ध होणार आहे. असे कृषी अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

खरिपासाठी शेतकऱ्यांकडून सध्या डीएपी व युरिया खताची मोठ्या प्रमाणात मागणी आहे. मात्र, विक्री केंद्रांमध्ये ही खते उपलब्ध नाहीत. त्यामुळे कृषी विभागाने ही खते तातडीने विक्री केंद्रांमध्ये उपलब्ध करून देण्याची गरज असल्याचे कृषी व्यवसायिकांनीसांगितले.

गेल्या १५ दिवसांपासून डीएपी आणि युरिया खताचा पुरवठा नाही. शेतकऱ्यांकडून या खतांसाठी सर्वाधिक मागणी आहे. मात्र, ही खते सध्या दुकानांत उपलब्ध नसल्याने पर्यायी खतांचा वापर करण्याचे आम्ही शेतकऱ्यांना सांगत असल्याचे खत विक्रेत्यांनी म्हटले आहे.

## वझर येथे आज होळकर जयंती

प्रतिनिधी । हणेगाव

वझर येथे राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त मंगळवार दि. २ जून रोजी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अहिल्यादेवी होळकर यांच्या उत्सव समितीच्या वतीने सर्व रोगनिदान शिबिर व तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व धनगर समाजाचे नेते दीपक बोराडे यांच्या मार्गदर्शनाचा कार्यक्रम होणार आहे. तसेच या जयंतीनिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रम व समाज प्रबोधनाचे कार्यक्रम आणि सर्व रोग निदान शिबिर आदी उपक्रम राबविण्यात येत असून यावेळी तज्ञ डॉ, यांचे मार्गदर्शन लाभणार आहे व अनेक रोगाचे निदान व मार्गदर्शन करण्यात येणार असून यावेळी डॉ, राम मदने ( एम ,डी, मेडिसिन) व तसेच डॉ, राम श्रीरामे ( बालरोगतज्ञ) डॉ,दिलीप मदने (हाड व स्नायू तज्ञ )डॉ, सचिन मंतावर (नेत्र तज्ञ) डॉ, प्रियंका मंतावर (कान नाक घसा तज्ञ )डॉ,नितीन मदने (स्त्री रोग तज्ञ) डॉ, रवी सुरनर (दमा व छाती विकार तज्ञ) आधी जण उपस्थित राहणार असून कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय अधिकारी अनुप पाटील व तसेच तहसीलदार भरत सूर्यवंशी आदी जन उपस्थित राहणार आहेत तरी या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन जयंती मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## रुग्ण व नातेवाईकांसाठी वॉटर फिल्टर विथ कुलरचे दान

प्रतिनिधी । नांदेड

डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, विष्णुपुरी येथे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना स्वच्छ व आरोग्यदायी पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे या उद्देशाने वॉटर फिल्टर विथ कुलर दान करण्यात आला आहे.

भीषण उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर रुग्ण व नातेवाईकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन हॅपी क्लब व नांदेड शांतता कमिटी यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. ॲड. मोहम्मद कासिम वसीम बाबुसेठ तसेच हॅपी क्लबचे अध्यक्ष मोहम्मद शोहेब यांच्या सहकार्याने बालरोग विभागातील वॉर्ड क्रमांक ७ साठी हा वॉटर फिल्टर विथ कुलर रुग्णालयास प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख, वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजयकुमार कापसे, बालरोग विभागप्रमुख डॉ. किशोर राठोड, उपवैद्यकीय अधीक्षक डॉ. शिवानंद देवसरकर, अधिसेविका बी. आर. मुदीराज यांच्यासह कर्मचारी व रुग्णनातेवाईक उपस्थित होते. यावेळी अधिष्ठाता डॉ. देशमुख यांनी समाजातील दाते, सामाजिक संस्था आणि सुजाण नागरिकांनी सामाजिक दायित्वाच्या





भावनेतून रुग्णालयाला रुग्णोपयोगी साहित्य उपलब्ध करून द्यावे, असे आवाहन केले. अशा उपक्रमांमुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना थेट लाभ मिळत असून अधिकाधिक दाते पुढे येऊन आरोग्यसेवेसाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देतील, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.देण्यात आलेल्या साहित्याची योग्य देखभाल व व्यवस्थापन करण्याच्या सूचनाही संबंधित वॉर्डाला देण्यात आल्या. तसेच रुग्ण व नातेवाईकांनी उपलब्ध सुविधांचा जबाबदारीने वापर करावा, असे आवाहन करण्यात आले.या उपक्रमासाठी रुग्णालय प्रशासनाच्या वतीने राजरत्न केळकर व कुणाल महागडे (समाजसेवा अधीक्षक) यांनी संस्थेशी समन्वय साधून अधिष्ठाता यांच्या मार्गदर्शनाखाली वॉटर फिल्टर उपलब्ध करून घेण्यासाठी विशेष प्रयत्न केले. रुग्णालय प्रशासनाने दात्यांचे आभार मानून भविष्यातही अशा सामाजिक उपक्रमांसाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले.

## संक्षिप्त

### बॉक्सिंग संघ निवड चाचणी

**नांदेड :** महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशन (कंपनी अधि नियमाच्या कलम ८ अंतर्गत नोंदणीकृत) १५ वर्ष सब जुनियर व कब क्लास ११ वयोगटातील मुले व मुली महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद स्पर्धा १० ते १५ जून २०२६ जळगाव येथे होत असून या स्पर्धेसाठी खेळाडूची वयोमर्यादा सब ज्युनिअर १५ साठी १ जानेवारी २०१२ ते ३१ डिसेंबर २०१३ व ११ कब क्लास साठी १ जानेवारी २०१६ ते ३१ डिसेंबर २०१७ या दरम्यान जन्मलेले खेळाडू पात्र राहतील.

### शहरात ५रोजी परिसंवादाचे आयोजन

**नांदेड:** फारुख अहमद लिखित मुसलमानोंका सियासी अजेंडा या पुस्तकावरील परिसंवादांचे आयोजन शुक्रवार दि. ५ जून २०२६ रोजी शहरातील सायन्स कॉलेजच्या पुरणमल लाहोटी सभागृहात सायंकाळी ६.३० वा. करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शैक्षणिक व सामाजिक प्रश्नांचे अभ्यासक बालाजी थोटवे हे राहणार आहेत. या पुस्तकावर कोल्हापूर येथील ज्येष्ठ साम्यवादी नेत्या स्मिता पानसरे, ज्येष्ठ पत्रकार अल्ताफ सोनी हे भाष्य करणार आहेत.

### वादळी वाऱ्याने केळीच्या बागांना फटका

**नांदेड:** जिल्हयात काल तुरळक झालेल्या वादळी वाऱ्यासह पावसाने अर्धापूर, मुदखेड परिसरात जोरदार हजेरी दिली. या पावसाने केळी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. बारड, निवघा या भागातही केळीचे मोठे नुकसान झाले आहे. या भागात प्रशासनाने नुकसानीची पहाणी करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली.

## स्वारातीम विद्यापीठात अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी



प्रतिनिधी । नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्ष येथे रविवार, दि.३१ मे, २०२६ रोजी अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या प्रसंगी विद्यापीठाचे प्र-कुलगरू डॉ. अशोक महाजन यांच्या हस्ते अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, शिवाजी चांदणे, शैलेष कांबळे, संभाजी धनमाने, बबन हिंगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी यांच्यासह विद्यार्थ्यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## पारडी येथील दोन लॉज चालकांना ग्रामपंचायतीची नोटीस

### महिला सरपंचाचा ऐतिहासिक निर्णय

प्रतिनिधी । लोहा

राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ वर तालुक्यातील पारडी ग्रामपंचायत हद्दीतील 'रणवीर लॉज' व ''रुद्रा लॉज'' या नावाने ग्रामपंचायतीची कोणतीही पूर्वपरवानगी, ना-हरकत दाखला व व्यापार परवाना न घेता अनधिकृतपणे लॉजिंग रूम भाड्याने देण्याचा व्यवसाय चालवत असल्याचे असे ग्रामपंचायतीच्या निदर्शनास आले.

याबरोबरच अनैतिक, असामाजिक व बेकायदेशीर कृत्ये होत असल्याच्या गंभीर लेखी व तोंडी तक्रारी ग्रामस्थांनी, महिलांनी ग्रामपंचायतीकडे केल्या होत्या.तसेच पारडी हद्दीतील 'रणवीर लॉज'व 'रुद्रा लॉज' मालक चालकांना लॉज तात्काळ कायमस्वरूपी बंद करण्यासाठी पारडी ग्रामपंचायतीने दिल्या अंतिम नोटिसा दिल्या असून सौ.रूकूताई उद्धव डिकळे या पारडी येथील बिनविरोध महिला सरपंचाचा ऐतिहासिक निर्णय घेतला.

सदरील निवेदनात असे नमुद केले आहे की,महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ चे कलम ४५ व ४८ अन्वये ग्रामपंचायतीच्या हद्दीत कोणताही व्यवसाय सुरु करण्यापूर्वी ग्रामपंचायतीचा परवाना घेणे बंधनकारक आहे.आपण सदर कायद्याचे उल्लंघन केलेले आहे.

तसेच आपल्या 'रणवीर लॉज' व ''रुद्रा लॉज '' मध्ये अनैतिक, असामाजिक व बेकायदेशीर कृत्ये होत असल्याच्या गंभीर लेखी व तोंडी तक्रारी ग्रामस्थांनी, विशेषतः महिलांनी ग्रामपंचायतीकडे केलेल्या आहेत. यामुळे गावातील सार्वजनिक शांतता, कायदा व सुव्यवस्था भंग पावत असून महिला व मुलींच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.ग्रामसभेत ठराव क्र. ५/२०२६ अन्वये आपले अनधिकृत ''रणवीर लॉज'' व ''रुद्रा लॉज'' तात्काळ बंद करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आलेला आहे.ही नोटीस मिळाल्यापासून ७ दिवसांच्या आत म्हणजेच दि. ८-०६-२०२६ पर्यंत आपला अनधिकृत 'रणवीर लॉज' व ''रुद्रा लॉजकायमस्वरूपी बंद करावा व यापुढे कोणत्याही प्रकारचा लॉजिंग व्यवसाय करू नये.विहित मुदतीत व्यवसाय बंद न केल्यास ग्रामपंचायत अधिनियम व भारतीय न्याय संहिता अंतर्गत आपल्यावर दंडात्मक व फौजदारी कारवाई करण्यात येईल असा इशारा दिला आहे.

### कारवाईसाठी मदत मिळावी

निवेदनाच्या प्रति तहसीलदार, तहसील कार्यालय लोहा, गटविकास अधिकारी, पंचायत समिती लोहा,पोलीस निरीक्षक,पोलीस स्टेशन लोहा सदर लॉजवर लक्ष ठेवून दि. ८-६-२०२६ नंतर सील कारवाईसाठी मदत मिळावी ही विनंती असेही नमूद केले आहे.

### महिला व मुलींचा सुरक्षेचा गंभीर प्रश्न

रणवीर लॉज व रुद्रा लॉज मध्ये अनैतिक, असामाजिक व बेकायदेशीर कृत्ये होत असल्याच्या गंभीर लेखी व तोंडी तक्रारी ग्रामस्थांनी, विशेषतः महिलांनी ग्रामपंचायतीकडे केल्या.यामुळे गावातील सार्वजनिक शांतता, कायदा व सुव्यवस्था भंग पावत असून महिला व मुलींच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला.

## दहा दिवसीय श्रामणेर बौद्धाचार्य प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

प्रतिनिधी । किनवट

भारतीय बौद्ध महासभा, तालुका शाखा किनवट यांच्या वतीने दि. ५ जून ते १४ जून २०२६ या कालावधीत एम.के.टी. स्कूल (एस.ओ.एस.) कोठारी येथे दहा दिवसीय श्रामणेर बौद्धाचार्य प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. बौद्ध धम्माचा प्रचार-प्रसार, धार्मिक संस्कारांची जोपासना तसेच समाजात सक्षम आणि प्रशिक्षित धम्मकार्यकर्ते निर्माण करण्याच्या उद्देशाने हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिरात गोकुंदा व किनवट परिसरातील भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी, ग्राम शाखा व वार्ड शाखांचे पदाधिकारी, बौद्ध उपासक-उपासिका, इयत्ता १० वी व १२ वी शिक्षण पूर्ण केलेले युवक-युवती, समाजकार्यामध्ये सक्रिय असलेले कार्यकर्ते, शिक्षक, डॉक्टर तसेच विविध क्षेत्रातील व्यावसायिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

शिबिरादरम्यान पूज्य भंते आणि केंद्रीय स्तरावरील तज्ज्ञ शिक्षकांकडून बौद्ध धम्म, त्रिशरण पंचशील, बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, बौद्ध संस्कार पद्धती, धम्मप्रसाराची तत्त्वे, सामाजिक नेतृत्व विकास तसेच संघटनात्मक कार्य याबाबत सखोल मार्गदर्शन केले जाणार आहे. याशिवाय सहभागींच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

या प्रशिक्षणामुळे समाजातील युवकांना धम्मकार्याची दिशा मिळणार असून बौद्ध समाजात प्रशिक्षित बौद्धाचार्यांची नवीन पिढी तयार होण्यास मदत होणार आहे. शिबिरात सहभागी होण्यासाठी नावनोंदणी करणे आवश्यक असून इच्छुकांनी वेळेत आपली नोंदणी करून या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन भारतीय बौद्ध महासभा, तालुका शाखा किनवट यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## एसटीचा ७८ वा वर्धापन दिन उत्साहात



प्रतिनिधी । नांदेड

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त सकाळी ८ वाजता नांदेड बसस्थानक येथे विश्वासू प्रवासी संघटनेच्या वतीने व आगार च्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी केक कापून वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला तसेच बसस्थानकाच्या स्वच्छतेसाठी नव्याने उपलब्ध करण्यात आलेल्या क्लिनिंग मशिनचे उद्घाटनही करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात विश्वासू प्रवासी संघटनेचे अध्यक्ष शंकरराव नांदेडकर यांच्या हस्ते केक कापून करण्यात आली. यावेळी विभाग नियंत्रक डॉ. महेश वडस्कर, विभाग यंत्र अभियंता अभिजीत कोरडकर बसस्थानक प्रमुख यासीन खान, संघटनेचे उपाध्यक्ष कृष्णा उमरीकर, सहसचिव रमाकांत घोणसीकर यांच्यासह एसटी अधिकारी, वाहतूक नियंत्रक आकाश भिसे, उचेकर, सुरेश फुलारी,शेख ताजुद्दीन, मयूर तेलंगे, विद्याकार, प्रभारक, बासवाडेकर, बोधनकर,जगताप हाराळे ,कर्मचारी आणि प्रवासी उपस्थित होते.

वर्धापन दिनाच्या निमित्ताने नांदेड बसस्थानक अधिक स्वच्छ व प्रवाशांसाठी सुविधायुक्त करण्याच्या दृष्टीने क्लिनिंग मशिनचे उद्घाटन विभाग नियंत्रक महेश वडस्कर व विश्वासू प्रवासी संघटनेचे अध्यक्ष शंकरराव नांदेडकर यांच्या हस्ते करण्यात आले. या मशिनमुळे बसस्थानक परिसराच्या स्वच्छतेमध्ये अधिक प्रभावीपणे सुधारणा होणार असून प्रवाशांना स्वच्छ आणि सुस्थितीत वातावरण उपलब्ध होण्यास मदत होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## नेहा कांबळेने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत १२ वी परीक्षा केली उत्तीर्ण

प्रतिनिधी । किनवट

अतिदुर्गम गुंडवळ गावातील कु. नेहा भीमराव कांबळे हिने प्रतिकूल



परिस्थितीवर मात करत श्री रेणुकादेवी महाविद्यालय येथून १२ वी विज्ञान शाखेची परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली आहे.

स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून पोलिस अधिकारी बनण्याचे तिचे ध्येय आहे. ज्या भागात आजही एस.टी. बस पोहोचलेली नाही, अशा दुर्गम परिसरातून कधी खडतर प्रवास तर कधी पायपीट करत तिने प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली आणि स्वतःच्या मेहनतीच्या जोरावर हे यश संपादन केले. आर्थिक परिस्थिती साधारण असली तरी ''एक भाकर कमी खाईन, पण मुलीला स्वतःच्या पायावर उभी करीन,'' हा तिच्या वडिलांचा निर्धार प्रेरणादायी आहे. ज्ञान, जिद्द आणि संघर्षाच्या बळावर पुढे वाटचाल करणाऱ्या या पिता-कन्येचे सर्वस्तरातून विशेष कौतुक केले आहे.

## ज्येष्ठ पौर्णिमा उत्साहात साजरी

प्रतिनिधी । नांदेड

येथील बोधीवृक्ष महिला मंडळाच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते धम्मवेडी रमाबाई सुभाष चंदनशिवे आयोजित रेल्वे कॉलनीतील संकल्प भूमी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक सभागृहात ३२५ वी ज्येष्ठ पौर्णिमा उत्साहात (३० रोजी) साजरी करण्यात आली.

प्रारंभी तथागत गौतम बुद्ध आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले आहे.बौद्ध महासभेचे अध्यक्ष बोधाचार्य उत्तम हुताडे यांनी त्रिशरण पंचशील



अनुयायांना समर्पित केले आहे .

यावेळी नगीनाबाई नरवाडे, शाहीर अशोक हनुमंते, वैजनाथ कसबे , सुरेखा चव्हाण , अनुसया भंडारे , छाया कदम ,शांताबाई लांडगे, छाया सेजल, सुधीर भालेराव ,रमाबाई लोने, गयाबाई केळकर व उमरीकर महिला मंडळ व सुगाव महिला मंडळ यांनी या धम्म कार्याला साथ दिली. शेवटी फळे व खीर वाटप करून कार्यक्रमाची सांगता केली.

**सन्मान** | स्वारातीम विद्यापीठात कर्मचाऱ्यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा संपन्न

## विद्यापीठ हे केवळ संस्था नसून एक कुटूंब : प्र-कुलगुरू

प्रतिनिधी । नांदेड

स्वारातीम विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करताना, ''विद्यापीठ हे केवळ संस्था नसून एक कुटुंब आहे. या कुटुंबातील सदस्यांच्या प्रदीर्घ आणि निष्ठावंत सेवेचा गौरव करणे ही विद्यापीठाची समृद्ध परंपरा आहे,'' असे प्रतिपादन केले. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात दीर्घकाळ समर्पित सेवा बजावून सेवानिवृत्त होत असलेल्या तीन कर्मचाऱ्यांचा सपत्नीक सेवापूर्ती गौरव सोहळा अधिसभा सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विद्यापीठाच्या वतीने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सपत्नीक शाल, स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र तसेच साडी-



चोळी देऊन सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन हे होते. व्यासपीठावर कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, नवोपक्रम व नवसंशोधन मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. मारुती गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी विद्यापीठातील विविध विभागांत उल्लेखनीय सेवा बजावलेल्या श्याम भरतराव डाकोरे (लेखाधिकारी), श्यामराव शेषराव हंबर्डे (सेवक) आणि आसाराम बापूराव काटकर (सफाईदार) यांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला. लेखाधिकारी श्याम भरतराव डाकोरे यांनी विद्यापीठात सुमारे ३० वर्षे सेवा बजावत संपदा विभाग, लेखा विभाग, भंडार विभाग आणि प्रकाशन विभागात कार्य केले.

श्यामराव शेषराव हंबर्डे यांनी १९९६ पासून सेवक पदावर कार्यरत राहून संपदा विभाग, विद्यार्थी विकास विभाग, प्रकाशन विभाग आणि परीक्षा विभागात आपली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. तर आसाराम बापूराव काटकर यांनी सफाईदार पदावर कार्यरत राहून पात्रता विभाग, स्थावर विभाग, कुलगुरू निवासस्थान, शैक्षणिक विभाग, माध्यमशास्त्र संकुल तसेच श्री गुरु गोविंद सिंगजी अध्यासन संकुल व संशोधन केंद्र येथे सेवा बजावली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. जगदीश कुलकर्णी यांनी केले. या सोहळ्यास विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, मान्यवर तसेच सत्कारमूर्तींचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नाईक यांची प्रदेश उपाध्यक्षपदी निवड



प्रतिनिधी । किनवट

किनवट-माहूर तालुक्याचे युवा नेते अर्चित नाईक यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गट) युवक विभागाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे किनवट विधानसभेत पक्षाला संघटनात्मक बळ मिळणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

दिवंगत माजी आ. स्व. प्रदीप नाईक यांचे पुतणे असलेले अर्चित नाईक यांनी युवकांमध्ये संघटनात्मक कार्य करत मोठा जनसंपर्क निर्माण केला आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत युवक प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख यांनी त्यांना नियुक्तीपत्र देऊन प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्त केले.किनवट व माहूर तालुक्यात युवकांमध्ये अर्चित नाईक यांचा प्रभाव असून त्यांच्या निवडीमुळे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाला या भागात अधिक बळ मिळेल, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

दरम्यान, त्यांच्या निवडीचे वृत्त समजताच सारखणी व मांडवीपरिसरात पक्षाच्या कार्यकर्त्यांनी फटाके फोडून आणि मिठाई वाटप करून आनंदोत्सव साजरा केला.


**CHANGE IN NAME**

My old name is Dellon Rajendersingh which now I am changing as New Name Harjinder Singh Pritam Singh Dhillon. Hence forth my all correspondence will be done as per my New name please consider the same.

:: Address ::

H.no 3- 6- 343 Shahidpura Gurudwara Gate no 6 Near sachkhand Gurudwara Nanded, P.O Vajirabad Dist Nanded Maharashtra 431601

**CHANGE IN NAME.**

My old name is Dellon Ram Kaur which now I m changing as New Name Ram Kaur Harjinder Singh Dhillon. Hence forth my all correspondence will be done as per my New name please consider the same.

:: Address ::

W/O Harjinder Singh Dhillon,H.no. 3-6-343 Shahidpura Gurudwara Gate no 6 Near sachkhand Gurudwara Nanded.

P.O Vajirabad Dist Nanded Maharashtra 431601

संपादकीय

# मराठी भावगीतांचे 'सुमन'...!

**हिं**दी आणि मराठी चित्रपटसृष्टीला आपल्या सुमधुर आवाजाने समृद्ध करणाऱ्या ज्येष्ठ पार्श्वगायिका पद्मभूषण सुमन कल्याणपूर यांचे रविवारी निधन झाले. त्यांच्या निधनाने संगीत क्षेत्रातील एक सुवर्णपर्व संपले आहे. सुमन कल्याणपुर नुसते नाव उच्चारले तरी निर्मळ, शांत, सोज्वळ, सात्विक चेहरा आणि तेवढाच मधुर आवाज आठवतो. त्यांची गाणी जितकी प्रसिद्ध झाली तितक्याच त्या प्रसिद्धिपासून अलिप्त राहिल्या. सुमन कल्याणपूर यांच्या निधनाने एक हरहुन्नरी आणि सुरेल गायिका गमावली आहे. त्यांच्या आवाजातील गोडवा आणि त्यांनी गायलेली गाणी पिढ्यानपिढ्या रसिकांच्या मनात घर करून राहतील. सात दशकांहून अधिक काळ त्यांनी आपल्या सुमधूर आवाजाच्या बळावर स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली होती. एका गाण्याच्या कार्यक्रमाच्या वेळी तलत महमूद यांनी सुमन कल्याणकर यांच्या आवाजाने प्रभावित होऊन एचएमव्ही कंपनीकडे त्यांच्या नावाची शिफारस केली आणि वयाच्या १७ व्या वर्षी त्यांनी मोहमद शफी यांनी संगीत दिलेल्या मंगु या चित्रपटासाठी प्रथम पार्श्वगायन केले होते. त्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. लता मंगेशकर, शमशाद बेगम आणि आशा भोसले यांच्या गाण्याचा तारकामंडळात त्यांनी मानाचे स्थान मिळवले. एवढेच नाही तर आपले स्वतंत्र असे स्थानही निर्माण केले. मात्र, शास्त्रीय संगीताचे उत्तम ज्ञान, मधुर आवाज आणि पार्श्वगायनाच्या क्षेत्रात आवश्यक असलेली सर्व वैशिष्ट्ये असूनही, त्यांची प्रतिभा हवी तशी लोकांसमोर उलगडली नाही. सुमन कल्याणपूर यांचा आवाज गानकोकिळा लता मंगेशकर यांच्या आवाजाशी खूप मिळताजुळता होता. त्यामुळे त्या काळात त्यांना अनेकदा आपली ओळख निर्माण करण्यासाठी अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागले. तरीही त्यांची अनेक गाणी लतादीदींच्या शैलीपासून वेगळी ओळखता झाली नाहीत. त्याचे कारण म्हणजे त्यांनी लतादीदींच्या तोडीच्या गुणवत्तेने गायन केले. स्वतः सुमन कल्याणपूर आपला आवाज आणि लतादीदींचा आवाज यातील साम्यामुळे खूप अस्वस्थ असत. सुरुवातीला तर त्यांना लता मंगेशकर यांच्यासोबत साम्य असल्यामुळे काही संगीतकारांनी दुसरी लता म्हणून पाहिले. पण, त्यांनी कधीही कटुता बाळगली नाही किंवा आक्रस्ताळेपणा केला नाही. उलट त्यांनी आपली स्वतः ची ओळख निर्माण केली. १९५० आणि १९६० च्या दशकातील काळ हिंदी चित्रपट संगीताचा सुवर्णकाळ म्हणून ओळखला जातो, ज्या काळात शमशाद बेगम आणि लता मंगेशकर यांसारख्या गायिकांनी पार्श्वगायनात वर्चस्व गाजवले होते. विशेष म्हणजे याच दशकात त्या लोकप्रिय गायिका होत्या. हिंदी, मराठी, आसामी, गुजराती, कन्नड, मैथिली, भोजपुरी, राजस्थानी, बंगाली, उडिया आणि पंजाबी व्यतिरिक्त त्यांनी अनेक भाषांमध्ये चित्रपटांची गाणी गायली. याच दरम्यान लता मंगेशकर आणि मोहम्मद रफी यांच्या दरम्यान रॉयल्टीच्या मुद्यावरुन वाद झाला. त्यामुळे लतादीदींबरोबर गाण्यास मोहम्मद रफी यांनी नकार दिला. त्यावेळी सुमन कल्याणपूर आणि मोहम्मद रफी यांनी अनेक युगुलगीते गायली. ही संख्या सुमारे १४० होती. आणि यातील अनेक गाणी लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचली. चित्रकलेच्या आवडीतून त्यांनी प्रतिष्ठित सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट महाविद्यालयात प्रवेश घेतला होता. त्याच काळात 'प्रभात फिल्म्स'चे संगीत दिग्दर्शक केशवराव भोळे यांच्याकडून शास्त्रीय गायन शिकण्यास सुरुवात केली. सुरुवातीला गाणे हा त्यांचा फक्त छंद होता. परंतु, हळूहळू त्यांची संगीतामधील रुची वाढली आणि त्यांनी उस्ताद खान, अब्दुल रहमान खान आणि मास्टर नवरंग यांच्याकडून संगीत शिक्षणास सुरुवात केली. १९५२ मध्ये 'ऑल इंडिया रेडिओ'मध्ये त्यांना गाण्याची संधी मिळाली. या संधीसाठी त्या नाही म्हणू शकल्या नाहीत. १९५३ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'शुक्राची चांदणी' या मराठी चित्रपटासाठी त्यांना गाण्याची संधी मिळाली. या माध्यमातून त्यांनी व्यावसायिक गायनाला सुरुवात केली. 'शुक्राची चांदणी'मधील गाण्यांमुळे शेख मुख्तार इतके प्रभावित झाले की, त्यांनी सुमन यांना 'मंगू' चित्रपटासाठी तीन गाणी गाण्याची संधी दिली. परंतु, या चित्रपटामध्ये त्यांनी एकच गाणे गायले. अशाप्रकारे १९५४ साली प्रदर्शित झालेल्या 'मंगू' या चित्रपटाच्या माध्यमातून त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. नंतर संगीतकार नौशाद, ओ. पी. नय्यर, मोहम्मद रफी, गीता दत्त, तलत महमूद यांसारख्या दिग्गजांसोबत त्यांनी संगीत क्षेत्रात काम केले. शंकर- जयकिशन, रोशन, मदनमोहन, एस. डी. बर्मन, एन. दत्ता, हेमंत कुमार, चित्रगुप्त, एस. एन. त्रिपाठी, गुलाम मोहम्मद, कल्याणजी-आनंदजी आणि लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांच्या मार्गदर्शनात त्यांनी ८५० पेक्षा जास्त चित्रपटांसाठी अनेक गाणी गायली. सुमन कल्याणपूर शुद्ध शास्त्रीय संगीत आणि नाट्यसंगीताकडे फारशा वळल्या नाहीत, तरी त्यांच्या गाण्यांमध्ये कमालीची शास्त्रीय बैठक होती. त्यांनी गायलेल्या मन मोहन मन मे हो तुम्ही या अजरामर गीताला मानाचा तानसेन पुरस्कार लाभला होता. त्यांची हिंदीसह मराठी चित्रपटगीते आणि भाव आणि भक्तिगीते प्रचंड गाजली. भावगीत गायनाची सुरुवात त्यांनी ग. दि. माडगूळकर यांनी लिहिलेल्या अजरामर गीतांनी केली. 'जिथे सागरा धरणी मिळते', 'घाल घाल पिंगा वाऱ्या माझ्या परसात', 'निंबोणीच्या झाडामागे चंद्र झोपला गं बाई', 'कशी गवळण राधा बावरली', 'नाविका रे, वारा वाहे रे डौलाने हाक जरा आज नाव रे', 'केतकीच्या बनी तिथे नाचला गं मोर', 'देव माझा विठु सावळा' अशी एकाहून एक सरस गाणी त्यांनी मराठीत गायली होती. सुमन कल्याणपूर यांनी गायलेले 'उठा उठा चिऊताई सारीकडे उजाडले' हे बालगीत तर आजच्या पिढीतील लहान मुलांच्या तोंडावरही रुळले आहे. त्यांच्या निधनाने भारतीय संगीत क्षेत्रातील एका सुवर्णयुगाचा अंत झाला असून मराठी भावगीत, भक्तीगीत आणि हिंदी चित्रपट संगीतात त्यांनी दिलेले योगदान कधीही न विसरता येणारे आहे. अनेकदा त्यांच्या आवाजाची तुलना लता मंगेशकर यांच्याशी केली जात असे. तरीही त्यांनी स्वतःच्या गायकीच्या शैलीतून एक वेगळी आणि स्वतंत्र ओळख निर्माण केली होती. त्यांच्या गाण्यातील नजाकता आजही रसिकांच्या मनाला भिडते. त्यांनी अनेक भारतीय भाषांमधून गायन करुन आपली कला सर्वदूर पोहोचवली. एक साधी आणि तितकीच प्रतिभावान गायिका म्हणून त्या कायम स्मरणात राहतील. सुमन कल्याणपूर यांचे संगीत क्षेत्रातील योगदान अतुलनीय आणि सदैव प्रेरणादायी आहे. आज हा सुरेल, मधुर आवाज शांत झाला असला तरी त्यांनी गायलेली गाणी आपल्या स्मरणात कायम राहतील. या महान गायिकेला भावपूर्ण श्रद्धांजली.

# एआय डेटा सेंटर्स: भारताला संधी की धोका?

– डॉ दीपक शिकारपूर, उद्योजक

**एआय डेटा सेंटर्स ही आधुनिक जगाची मेंदू-प्रणाली मानली जाते. डेटा सेंटर्समुळे मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मितीही होते; परंतु डेटा सेंटर्स मोठ्या प्रमाणावर वीज वापरतात आणि अनेक पर्यायरणीय समस्याही निर्माण करतात. त्यामुळे देशात डेटा सेंटर्स उभारताना हरित उर्जा, शद्धीकरण केलेले सांडपाणी यांचा वापर केला जावा. तसेच ही डेटा सेंटर्स शहरांपासून दूर, नियोजित औद्योगिक क्षेत्रांमध्ये उभारायला हवीत.**



**ए**कविसाव्या शतकात 'कृत्रिम बुद्धिमत्ता' मानवजातीच्या विकासाची एक नवी दिशा ठरली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) हा सध्याचा परवलीचा शब्द आहे. या तंत्रज्ञानाचा पाया म्हणजे डिजिटल डेटा आणि तो साठवण्यासाठी, प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक असलेली प्रचंड संगणकीय यंत्रणा म्हणजे डेटा सेंटर्स. एआय डेटा सेंटर्स म्हणजे जिथे हजारो शक्तिशाली सर्व्हर्स, सुपरकॉम्प्युटर्स, नेटवर्क डिव्हाइसेस आणि स्टोरेज सिस्टिम्स एकत्र काम करतात अशी अत्याधुनिक केंद्रे. या डेटा सेंटर्समध्ये प्रचंड प्रमाणातील डेटा साठवण, मशीन लर्निंग मॉडेल्सचे प्रशिक्षण, डीप लर्निंग प्रक्रिया, क्लाऊड कॉंप्युटिंग सेवा, रिअल-टाईम डेटा प्रोसेसिंग अशी अनेक कामे केली जातात. ही डेटा सेंटर्स हाय-परफॉर्मन्स संगणकप्रणाली, २४ बाय ७ अखंड कार्यप्रणाली, उच्च दर्जाची सुरक्षा प्रणाली, सायबर सिक्युरिटी, बायोमेट्रिक लॉक, फायरवॉल्स, प्रगत कूलिंग सिस्टीम, सर्व्हर्स गरम होऊ नयेत म्हणून विशेष एअर कंडिशनिंग आणि लिक्विड कूलिंग, ऑटोमेशन आणि रोबोटिक देखभाल यांनी सुसज्ज असतात. डेटा सेंटर्स कधीही बंद होत नाहीत. दिवस-रात्र सतत सुरू राहतात.

औद्योगिक युगात कारखान्यांसाठी वीज आवश्यक होती तसेच डिजिटल आणि कृत्रिम बुद्धिमत्ता युगात डेटा सेंटर्स आवश्यक आहेत. ज्या वेगाने भारतात आणि जगभरात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढत आहे, त्या वेगाने डेटा सेंटर्सची गरज वाढत आहे. परंतु ही गरज केवळ आर्थिक आणि तांत्रिक नाही. त्यासोबत पर्यावरण, ऊर्जा, पाणी, प्रदूषण, शहरांचे नियोजन आणि समाजावर होणारा परिणाम यांचाही गंभीर विचार करणे आवश्यक आहे. भारत हा जगातील सर्वात वेगाने डिजिटल होत असलेला देश आहे. मोबाईल वापर, इंटरनेट व्यवहार, ऑनलाइन शिक्षण, आरोग्यसेवा, सरकारी योजना, डिजिटल बँकिंग, ई-व्यापार, सामाजिक माध्यमे यामुळे भारतात दररोज अब्जावधी गिगाबाईट्स माहिती तयार होते. याशिवाय भारत सरकारचे डिजिटल भारत अभियान, आधार प्रणाली, वस्तू व सेवा कर व्यवस्था, ऑनलाइन सरकारी सेवा, आरोग्य ओळखपत्र, शिक्षण मंच, कृषी माहिती प्रणाली यामुळे सरकारलाही प्रचंड डेटा साठवावा लागतो. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित सेवा, मराठीसह भारतीय भाषांमधील भाषांतर प्रणाली, आवाज ओळख, शेतकऱ्यांसाठी हवामान आणि पीक सल्ला, रुग्णांसाठी निदान प्रणाली, वाहतूक नियंत्रण, गुन्हेगारी विश्लेषण या सर्वांसाठी भारताला स्वतःची मजबूत डेटा सेंटर्स लागतात. हा डेटा भारतात न ठेवता परदेशात ठेवला तर राष्ट्रीय सुरक्षा, गोपनीयता आणि स्वावलंबन धोक्यात येऊ शकते. म्हणूनच भारतात डेटा सेंटर्सचे जाळे उभे करणे ही राष्ट्रीय गरज बनली आहे.

डेटा सेंटर्स म्हणजे केवळ संगणकांची इमारत नाही, तर ती एक संपूर्ण उद्योग परिसंस्था निर्माण करतात. डेटा सेंटर उभे राहिले की त्यासाठी इमारत बांधणी, वीज व्यवस्था, शीतकरण प्रणाली (कूलग सिस्टिम्स), सुरक्षा व्यवस्था, नेटवर्क, सॉफ्टवेअर देखभाल, उपकरणे पुरवठा, स्वच्छता, वाहतूक, कर्मचारी सेवा, अग्निशमन व्यवस्था, दूरसंचार जोडणी अशा अनेक सेवा लागतात. त्यामुळे अभियंते, तंत्रज्ञ, इलेक्ट्रिशियन, यांत्रिक तज्ञ, सुरक्षा कर्मचारी, संगणक शास्त्रज्ञ, माहिती तंत्रज्ञान व्यावसायिक, प्रशासकीय कर्मचारी, वाहनचालक, कंत्राटदार अशा विविध स्तरांवर रोजगार निर्माण होतो. याशिवाय डेटा केंद्रांच्या आसपास माहिती तंत्रज्ञान कंपन्या, कृत्रिम बुद्धिमत्ता स्टार्टअप, संशोधन संस्था, प्रशिक्षण सेंटर्स, सेवा उद्योग वाढतात. संपूर्ण शहर किंवा जिल्ह्याचे अर्थकारण बदलू शकते. डेटा सेंटर्समध्ये अनेक आर्थिक संधी आहेत, तशीच त्यामुळे अनेक पर्यावरणीय आव्हानदेखील निर्माण होतात. एक मोठे डेटा सेंटर म्हणजे हजारो संगणक दिवस-रात्र सुरू ठेवणारी यंत्रणा. यासाठी प्रचंड प्रमाणात वीज लागते. काही मोठी डेटा सेंटर्स एखाद्या लहान शहराइतकी वीज वापरतात. ही वीज कोळसा, गॅस किंवा डिझेलवर आधारित असेल तर त्यामुळे कार्बन वायू मोठ्या प्रमाणात तयार होतो. यामुळे हवामानबदल अधिक तीव्र होतो. डेटा सेंटर्समधून उष्णता, आवाज, विद्युत कचरा आणि रासायनिक कचरा निर्माण होतो. योग्य व्यवस्थापन नसेल तर स्थानिक पर्यावरण, भूजल आणि हवा दूषित होऊ शकते.

या पर्यावरणीय आणि सामाजिक परिणामांमुळे काही देशांनी आणि शहरांनी डेटा सेंटर्सवर थेट बंदी किंवा कडक नियंत्रण आणले आहे. नेदरलँड्स या देशातील ॲमस्टरडॅम या शहराने २०२० मध्ये नवीन डेटा सेंटर्सवर तात्पुरती बंदी घातली. कारण शहरातील वीजेचा आणि जमिनीचा वापर अतिशय वेगाने वाढत होता आणि नागरिकांच्या गरजांसाठी संसाधने अपुरी पडत होती. आयर्लंडमध्ये, विशेषतः डब्लिन परिसरात विद्युत नेटवर्कवरील ताण वाढल्यामुळे अनेक नवीन डेटा केंद्रांना परवानगी नाकारण्यात आली आहे. आयर्लंड सरकारने स्पष्ट केले की देशाची वीज व्यवस्था धोक्यात येऊ शकते. सिंगापूरने २०१९ ते २०२३ या काळासाठी नवीन डेटा सेंटर्सवर बंदी घातली आहे, नॉर्वे आणि स्वीडनसारख्या देशांनी डेटा सेंटर्ससाठी कठोर ऊर्जा कार्यक्षमता नियम लागू केले आहेत आणि काही भागांमध्ये त्यांना मर्यादा घातल्या आहेत. जर्मनीमध्ये काही प्रांतांनी शहरांच्या मध्यभागी मोठ्या डेटा सेंटर्सना परवानगी देणे बंद केले आहे. भारतासाठी डेटा सेंटर्स अत्यावश्यक आहेत. परंतु अंधाधुंद वाढ भारतासाठी मोठी आपत्ती ठरू शकते. भारताने नवीकरणीय ऊर्जेवर आधारित डेटा सेंटर्सना प्रोत्साहन द्यायला हवे. सौरऊर्जा, पवनऊर्जा आणि जलविद्युत यांचा वापर करून डेटा सेंटर्स चालवली तर प्रदूषण कमी होईल. एक मोठे डेटा सेंटर म्हणजे हजारो संगणक दिवस-रात्र सुरू ठेवणारी यंत्रणा. यासाठी प्रचंड प्रमाणात वीज लागते. काही मोठी डेटा सेंटर्स एखाद्या लहान शहराइतकी वीज वापरतात. ही वीज कोळसा, गॅस किंवा डिझेलवर आधारित असेल तर त्यामुळे कार्बन वायू मोठ्या प्रमाणात तयार होतो. यामुळे हवामानबदल अधिक तीव्र होतो. डेटा सेंटर्समधून उष्णता, आवाज, विद्युत कचरा आणि रासायनिक कचरा निर्माण होतो. योग्य व्यवस्थापन नसेल तर स्थानिक पर्यावरण, भूजल आणि हवा दूषित होऊ शकते. पाण्याचा पुनर्वापर करणारी प्रणाली, पावसाचे पाणी साठवणे, शुद्धीकरण केलेले सांडपाणी वापरणे, अशा उपायांनी डेटा केंद्रांचे पाण्यावरील अवलंबित्व कमी करता येईल. डेटा सेंटर्स शहरांपासून दूर, नियोजित औद्योगिक क्षेत्रांमध्ये उभारली पाहिजेत. सरकारने स्पष्ट पर्यावरणीय नियम, वीज वापर मर्यादा, कार्बन उत्सर्जन निकष, स्थानिक लोकांच्या हिताचे संरक्षण असे कायदे करायला हवेत. कृत्रिम बुद्धिमत्ता ही भारताच्या विकासाची किल्ली आहे आणि डेटा सेंटर्स ही त्या किल्लीची कुलूप आहेत. योग्य प्रकारे उभारलेली, हरित ऊर्जेवर आधारित आणि नियंत्रित डेटा सेंटर्स भारताला जगातील डिजिटल महासत्ता बनवू शकतात. परंतु पर्यावरणाकडे दुर्लक्ष करून उभारलेली डेटा सेंटर्स भविष्यातील पाणी, वीज आणि हवामानासंदर्भातील संकटाचे मूळ ठरू शकतात. म्हणूनच भारताने जागतिक अनुभवातून शिकून दीर्घकालीन मार्ग स्वीकारणे ही काळाची गरज आहे.

निमित्त

# जनगणनेचे वास्तव अन् आव्हान



**छ**त्रपती संभाजीनगर जिल्ह्यात एका शिक्षकाचा जनगणनेच्या कामादरम्यान उष्माघाताने मृत्यू झाल्याची अत्यंत धक्कादायक घटना घडली आहे. कडक उन्हात फिरल्यामुळे त्यांना उष्माघाताचा तीव्र झटका बसला. प्रकृती गंभीर झाल्यानंतर त्यांना तातडीने घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांच्या सर्व प्रयत्नांनंतरही त्यांची प्राणज्योत मालवली. या घटनेनंतर नातेवाईक आणि शिक्षकांनी घाटी रुग्णालयाबाहेर प्रशासनाविरोधात निदर्शने केली. ही एक घटना वाईट आहेच, पण त्याकडे दुर्लक्षही करता येत नाही. कारण, जनगणनेचे काम शारीरिक कष्टासह मानसिक छळवणुकीचे ठरत आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत, जेव्हा सूर्य आग ओकत असतो, अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत या कर्मचाऱ्यांना पुरेशी विश्रांती न देता सक्तीने मैदानावर उतरवले जात आहे. कडक उन्हामध्ये पायी चालणे, प्रत्येक घराची माहिती अचूकपणे नोंदवणे आणि प्रशासनाने दिलेले उद्दिष्ट वेळेत पूर्ण करणे या दबावामुळे कर्मचाऱ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या कामासाठी प्रशासनाकडून वाहतूक व्यवस्था, आरोग्य सुरक्षा किंवा प्राथमिक सुविधा पुरवल्या जात नाहीत, हे खेदजनक वास्तव आहे.

सध्या राज्याच्या विविध भागांत, विशेषतः मराठवाड्यात उन्हाचा पारा ४२ ते ४४ अंश सेल्सिअसच्या पुढे गेला आहे. भयानक उष्णतेच्या लाटांमुळे सामान्य नागरिकांना घराबाहेर पडणे कठीण झाले आहे. अशा जीवघेण्या हवामानात हे कर्मचारी सर्वेक्षणासाठी बाहेर पडतात, तेव्हा त्यांना अनंत अडचणींना तोंड द्यावे लागते. दरोदार फिरताना अनेकदा लोकांकडून अत्यंत उद्धट, संशयी आणि असहकार्याची वागणूक मिळते. नागरिक बऱ्याचदा आपली अचूक वैयक्तिक माहिती, आधार किंवा आर्थिक तपशील देण्यास थेट नकार देतात, किंवा अनेकदा तर कर्मचाऱ्यांना दारातूनच हाकलून लावतात. शासकीय कर्मचारी केवळ आपले कर्तव्य बजावत आहेत, याचे भान न ठेवता लोक आपला सगळा राग त्यांच्यावर काढतात. या मानसिक त्रासासोबतच, अनोळखी गल्लीबोळांमधून फिरताना भटक्या तसेच पाळीव कुत्र्यांचा मोठा उपद्रव होतो; अनेक कर्मचाऱ्यांना कुत्रे अंगावर धावून येणे किंवा चावा घेण्याच्या भीषण प्रसंगांना सामोरे जावे लागले आहे.

असे असले तरी, देशाच्या शाश्वत विकासासाठी जनगणनेचे काम हे अत्यंत महत्त्वाचे आणि पायाभूत मानले जाते. जनगणना म्हणजे केवळ लोकसंख्येची मोजणी नसून, तिच्या आधारेच देशाच्या भविष्यातील सर्व आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक धोरणांची आखणी केली जाते. सरकारी योजना, आरोग्य सेवांचे जाळे, शाळा-महाविद्यालयांची निर्मिती आणि तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचणारे अनुदान हे सर्व याच जनगणनेच्या आकडेवारीवर अवलंबून असते. त्यामुळे हे राष्ट्रीय कर्तव्य पूर्ण करणे जितके आवश्यक आहे, तितकेच हे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या जीवाची सुरक्षा करणेही प्रशासनाचे आद्य कर्तव्य आहे.

हे काम अधिक सुलभ करण्यासाठी प्रशासनाने कर्मचाऱ्यांना उन्हाळ्यात फिरण्यासाठी हक्काचा प्रवास भत्ता किंवा वाहनांची सोय उपलब्ध करून दिली पाहिजे. प्रत्येक कर्मचाऱ्याला ओआरएस पावडर, प्रथमोपचार किट आणि पुरेसे पाणी पुरवणे बंधनकारक असावे. अशा मोहिमेदरम्यान प्रत्येक कर्मचाऱ्याचा सक्तीचा आरोग्य विमा उतरवला गेला पाहिजे. कोणत्याही राष्ट्रीय कर्तव्याची किंमत ही कर्मचाऱ्याच्या प्राणापेक्षा मोठी असू शकत नाही, याचे भान प्रशासनाने राखणे अत्यंत गरजेचे आहे.

जगाच्या पाठीवर

# दक्षिण आफ्रिकेची पर्यटनात झेप

**द**क्षिण आफ्रिकेने आंतरराष्ट्रीय पर्यटन क्षेत्रात २०२६ मध्ये सर्वात वाढ दर्शविली आहे. स्टॅटिस्टिक्स साऊथ आफ्रिका इंटरनॅशनल टुरिझमच्या ताज्या अहवालानुसार, केवळ एप्रिल महिन्यात तब्बल ९ लाख ८९ हजार ३२९ आंतरराष्ट्रीय पर्यटकांनी दक्षिण आफ्रिकेला भेट दिली. पश्चिम आशियातील युद्धामुळे जागतिक विमान वाहतुकीत मोठे अडथळे निर्माण झाले आहेत. विमानांच्या तिकिटांचे दरही गगनाला भिडले आहेत. असे असूनही दक्षिण आफ्रिकेच्या पर्यटन क्षेत्राने ही चमकदार कामगिरी करून दाखवली आहे. ही वाढ गेल्या वर्षीच्या म्हणजेच एप्रिल २०२५ च्या तुलनेत १९.५ टक्क्यांनी अधिक आहे. दक्षिण आफ्रिकेच्या पर्यटन मंत्री पेट्रीशिया डी लिले यांनी याचे स्वागत केले आहे. त्या म्हणाल्या की, जागतिक पातळीवर विमान प्रवासाच्या संदर्भात अनेक अडचणी आणि खर्च वाढत असतानाही दक्षिण आफ्रिकेने अनेक क्षेत्रांमध्ये लक्षणीय वाढही नोंदवली आहे. २०२६ च्या पहिल्या चार महिन्यांत म्हणजे जानेवारी ते एप्रिल या कालावधीत एकूण ३८ लाख ९९ हजार ३५८ आंतरराष्ट्रीय पर्यटक दाखल झाले. ही संख्या गेल्या वर्षाच्या याच कालावधीच्या तुलनेत ४ लाख ८२ हजार ९३५ ने जास्त आहे. या वाढीमध्ये काही विशिष्ट



देशांमधून येणाऱ्या पर्यटकांची भूमिका महत्त्वाची ठरली आहे. सिंगापूरमधून येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत एप्रिल महिन्यात ७०.५ टक्क्यांची प्रचंड वाढ झाली. आगामी काळात दक्षिण आफ्रिकेचे हे पर्यटन क्षेत्र आणखी विस्तारण्याची शक्यता आहे. कारण अनेक आंतरराष्ट्रीय विमान कंपन्या दक्षिण आफ्रिकेसाठी नवीन थेट विमान सेवा सुरू करत आहेत. ब्राझीलची लाटम एअरलाइन्स वाढत्या मागणीमुळे साओ पावलो ते केपटाऊन दरम्यान जुलै महिन्यापासून आठवड्यातून तीन थेट विमाने सुरू करणार आहे. स्पेनची एअर युरोपा ही विमान कंपनी २४ जून २०२६ पासून माद्रिद ते जोहान्सबर्ग दरम्यान आपली पहिली थेट विमान सेवा सुरू करणार आहे. दक्षिण आफ्रिकेने दाखवलेली ही लवचिकता कौतुकास्पद आहे.

आयुष्य बदलणारे शास्त्रज्ञ

# प्राध्यापक व्ही. कामाकोटी

**प्रा**ध्यापक व्ही. कामाकोटी हे भारताच्या संगणक विज्ञान क्षेत्रातील आघाडीचे शास्त्रज्ञ आहेत. सध्या ते आयआयटी मद्रासचे संचालक आहेत. देशाच्या तंत्रज्ञान क्षेत्राला स्वावलंबी बनवण्यात त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यांच्या नेतृत्वात भारताने आपला पहिला संपूर्ण स्वदेशी मायक्रोप्रोसेसर शक्ती विकसित केला. हा शोध भारताच्या तंत्रज्ञान इतिहासातील एक मैलाचा दगड ठरला आहे. कारण यामुळे देशाची परकीय तंत्रज्ञानावरील अवलंबित्व कमी झाले आहे. प्रा. कामाकोटी यांच्या या अभूतपूर्व कामगिरीमुळे भारत सरकारने त्यांना पद्मश्री या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित केले आहे. शक्ती मायक्रोप्रोसेसरच्या शोधामुळे भारताला आणि येथील सामान्य नागरिकांना अनेक स्तरांवर मोठे फायदे होणार आहेत. सर्वात महत्त्वाचा लाभ म्हणजे राष्ट्रीय सुरक्षा आणि डेटा गोपनीयता. आजच्या डिजिटल युगात इलेक्ट्रॉनिक उपकरणांमध्ये वापरले जाणारे बहुतांश प्रोसेसर परदेशातून आयात केले जातात, ज्यामध्ये सायबर सुरक्षेचे आणि डेटा चोरीचे मोठे धोके असतात. स्वदेशी शक्ती प्रोसेसरमुळे भारताला अत्यंत सुरक्षित आणि विश्वासार्ह संगणकीय प्रणाली मिळाली आहे. याचा वापर देशाच्या संरक्षण यंत्रणा, अणुऊर्जा प्रकल्प



आणि अंतराळ मोहिमांमध्ये केला जाऊ शकतो, ज्यामुळे देशाचा गोपनीय डेटा पूर्णपणे सुरक्षित राहील. शक्ती प्रोसेसरच्या निर्मितीमुळे भारतातच स्वस्त आणि दर्जेदार स्मार्टफोन, स्मार्ट मीटर्स, डिजिटल कॅमेरे, वैद्यकीय उपकरणे आणि इतर घरगुती इलेक्ट्रॉनिक वस्तूंचे उत्पादन करणे शक्य होणार आहे. यामुळे आयात शुल्क कमी होऊन इलेक्ट्रॉनिक वस्तू सामान्य माणसाला अत्यंत परवडणाऱ्या दरात उपलब्ध होतील. तसेच, देशांतर्गत उत्पादनाला चालना मिळाल्यामुळे भारतात मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील. त्यांनी देशाला केवळ एक प्रोसेसर दिला नाही, तर जागतिक महासत्ता बनण्याच्या दिशेने तंत्रज्ञानाचा भक्कम पाया दिला आहे.



# लेखकांना आवाहन

दैनिक सत्यप्रभासाठी विविध व प्रासंगिक विषयांवर लेख लिहून पाठवावेत. योग्य त्या लेखांना प्रसिद्धी देण्यात येईल. लेखकांनी आपला लेख युनिकोडमध्ये टाईप करून **dainiksatyaprabha2015@gmail.com** या मेलवर पाठवावेत.

**कार्यकारी संपादक**

नवा प्रयोग

# चेन्नई चेस क्लबने बुद्धिबळाद्वारे घडविला मैत्रीचा संगम

**चे**न्नईला भारताची बुद्धिबळाची राजधानी म्हणून ओळखले जाते. विश्वनाथन आनंदसारख्या महान बुद्धिबळपटूपासून ते प्रज्ञानंदसारख्या तरुण ग्रँडमास्टरपर्यंत अनेक हिरे या शहराने देशाला दिले आहेत. मात्र, बुद्धिबळ हा केवळ बंद खोलीत, गंभीर वातावरणात आणि केवळ स्पर्धांसाठीच खेळला जावा का? या प्रश्नातून चेन्नईमध्ये एका अनोख्या आणि रंजक प्रयोगाची सुरुवात केली आहे. चेन्नई चेस क्लबने बुद्धिबळाला चक्क कॅफे, रेस्टॉरंट्स आणि सार्वजनिक उद्यानांमध्ये आणले आहे. तेथे हा खेळ केवळ स्पर्धा न राहता एक सामाजिक उत्सव आणि मैत्रीचा कट्टा बनला आहे. या क्लबची सुरुवात अतिशय रंजक आहे. बुद्धिबळाची आवड असणाऱ्या काही मित्रांनी एकत्र येऊन हा उपक्रम सुरू केला. सुरुवातीला त्यांनी शहरातील काही कॅफे आणि पार्क्समध्ये विकेंडला एकत्र येऊन बुद्धिबळ खेळण्यास सुरुवात केली. त्यांच्या या साध्या प्रयत्नाला अल्पावधीतच इतका प्रचंड प्रतिसाद मिळाला की, आज या क्लबमध्ये लहान मुलांपासून ते वयोवृद्धांपर्यंत आणि नवशिक्यांपासून ते थेट आंतरराष्ट्रीय दर्जाच्या बुद्धिबळपटूंपर्यंत शेकडो लोक दर आठवड्याला एकत्र येतात. या क्लबचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे येथे येण्यासाठी कोणतेही शुल्क किंवा सदस्यत्व घेण्याची गरज नसते. बुद्धिबळ प्रेमी येथे येऊन कोणाशीही बुद्धिबळाचा डाव मांडू शकतो. यामुळे दडपण दूर होऊन खेळाचा



खरा आनंद घेता येतो.

या क्लबमुळे दोन पिढ्यांमधील अंतरही कमी होते. एका बाजूला ७० वर्षांचे आजोबा तर दुसऱ्या बाजूला ७ वर्षांचा मुलगा त्यांच्याशी उत्साहाने दोन हात करत असतो. अनेकदा अनोळखी लोक शेजारी बसून खेळतात आणि खेळ संपता संपता त्यांचे रूपांतर घट्ट मैत्रित होते. हा प्रयोग केवळ एका खेळापुरता मर्यादित नसून तो लोकांना एकमेकांशी जोडणारा एक भक्कम सामाजिक दुवा बनला आहे. डिजिटल स्क्रीनच्या दुनियेत अडकलेल्या आजच्या तरुणाईला प्रत्यक्ष मैदानावर किंवा कट्ट्यावर एकत्र आणण्याचे काम या क्लबने केले आहे. हा अनोखा प्रयोग भारताच्या इतर शहरांमध्ये आणि गावांमध्ये राबवला, तर त्याचे अत्यंत सकारात्मक आणि दूरगामी सामाजिक परिणाम पाहायला मिळतील.

आजच्या काळात भारतातील बहुतांश शहरे आणि गावे ही कॉंक्रिटची जंगले बनत चालली आहेत, जिथे लोक शेजाऱ्यांशीही संवाद साधत नाहीत. अशा परिस्थितीत जर स्थानिक कॅफे, पार्क्स, समाजमंदिरे किंवा वाचनालयांमध्ये चेस क्लब किंवा इतर खेळांचे कट्टे सुरू झाले, तर सार्वजनिक जागा पुन्हा एकदा जिवंत होतील. तरुणाईला मोबाईल गेमिंग आणि सोशल मीडियाच्या व्यसनातून बाहेर काढून रचनात्मक कामात गुंतवण्यासाठी हा एक उत्तम मार्ग ठरू शकतो. तसेच, यामुळे बुद्धिबळ हा खेळ केवळ उच्चभ्रू किंवा ठराविक लोकांपुरता मर्यादित न राहता सर्वसामान्यांपर्यंत पोहोचेल. त्यातून अनेक जागतिक दर्जाचे खेळाडू निर्माण होऊ शकतात. मानसिक आरोग्याच्या दृष्टीनेही असा प्रयोग एकाकीपणा दूर करण्यासाठी आणि ताणतणाव कमी करण्यासाठी रामबाण उपाय ठरेल. थोडक्यात सांगायचे तर, चेन्नई चेस क्लबने दाखवून दिलेला हा मार्ग संपूर्ण देशातील सामाजिक सलोखा आणि खेळाची संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी एक आदर्श मॉडेल ठरू शकतो.

सत्यप्रभा
हे पत्र मे न्यूजवॉच इंडिया प्रा. लि. करिता प्रकाशक **शिवानंद दिंगबरराव महाजन** द्वारा प्रकाशित आणि मुद्रक **संदीप विलासराव पाटील**, सुजया पब्लिकेशन्स प्रा. लि. द्वारा मुद्रीत केले आहे. मुद्रण व प्रकाशन स्थळ : १२१/१२२ सी, नांदेड को. ऑप. इंडस्ट्रीयल इस्टेट. लि., शिवाजीनगर नांदेड-२
**संपादक : शिवानंद दिगंबरराव महाजन**
**कार्यकारी संपादक : संतोष रामराव पांडागळे**
या अंकातील लेखांमधील लेखकांची मते त्यांची वैयक्तिक आहेत. संपादकीय मंडळ त्यांच्या मताशी सहमत असेलच असे नाही.
https://epaper.esatyaprabha.com
र.क्रं. २७९०९/७५.PR.No.-G2/RNP/NND-२५१/२०१८-२०२०
e_mail:dainiksatyaprabha2015@gmail.com

## संक्षिप्त

### वंदे भारतमध्ये असुविधाची तक्रार

**छत्रपती संभाजीनगर :** दर्जेदार सुविधा देणाऱ्या वंदे भारत एक्स्प्रेसमध्ये अनेक असुविधांचा सामना करावा लागत आहे, अशी तक्रार प्रवासी करत आहेत. रेल्वेतील स्वच्छतागृहातील घाण पाणी चक्क प्रवाशांच्या आसनापर्यंत पोहचल्याने दुर्गंधी पसरत असल्याची तक्रार मोहम्मद बाईयाश यांनी ३० मे रेल्वे प्रशासनाकडे केली आहे. हा प्रकार सी-८ कोचमध्ये घडला. तक्रारीनंतर तत्काळ दखल घेण्याची मागणी आहे.

### शेतकऱ्यांशी समन्वय साधूनच काम करा

**छत्रपती संभाजीनगर :** सातारा-देवळाई परिसरात सुरू असलेल्या ड्रेनेजलाईनचे काम करताना शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच पुढील कामकाज करावे, असे निर्देश महापालिका आयुक्त अमोल येडगे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. डीपी रस्त्यांचे अचूक सर्वेक्षण व मार्किंग न झाल्यामुळे काही ठिकाणी शेतकऱ्यांकडून कामाला विरोध होत असल्याचे पाहणीत समोर आले. आयुक्तांनी या भागात नुकतीच पाहणी केली.

### जालन्यात पकडला अवैध वाळूचा हायवा

**जालना:** उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या पथकाने अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई करत २० लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांना खबऱ्यामार्फत दूधना नदी पात्रातून रात्री वाळू वाहतूक केली जात असल्याची माहिती मिळाली होती. याप्रकरणी चालक सतीश बाबासाहेब खिल्लारे व वाहन मालक ऋषी शिवाजी काकडेयांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

### निवृत्त शिक्षकाचा कारच्या धडकेत मृत्यू

**बदनापूर :** शेलगाव येथे भरधाव कारच्या धडकेत गंभीर जखमी झालेल्या सेवानिवृत्त आदर्श शिक्षक विठ्ठल बाबुराव गालट (वय ७०) यांचे उपचारादरम्यान निधन झाले. हा अपघात २९ मे रोजी दुपारी अडीचच्या सुमारास झाला. धडकेनंतर गालट हे कारच्या बोनेटमध्ये अडकून काही अंतरापर्यंत फरफटत गेले. जालना येथे उपचार सुरू असताना त्यांचा ३० मे रोजी मृत्यू झाला.

### गोवंशाची हत्या, दोन जणांना अटक

**माजलगाव :** शहरात बकरी ईदच्या दिवशी २०० हून अधिक गोवंशांची हत्या झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आल्यानंतर याप्रकरणी शनिवारी रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्यात दोघांना अटक करण्यात आली. जफर गफर कुरेशी (वय २५) व इम्रान शकील कुरेशी (वय ३३ दोघ रा. खाटीक गल्ली) अशी त्यांची नावे आहेत.

### अवैध वाळूचा टिप्पर पाथरी येथे जप्त

**पाथरी :** गोपेगाव रोड येथे पोलीस अधीक्षकांच्या विशेष पथकाने एका टिप्पर वाहन थांबवून तपासणी केली. त्यात क्षमतेपेक्षा अधिक वाळू वाहतूक होत असल्याचे समोर आले. शिवाय वाळू वाहतुकीचा अधिकृत परवाना आढळला नाही. त्यामुळे वाळूसह टिप्पर जप्त करण्यात आला. या प्रकरणी वाहनचालक गजानन प्रल्हादराव पांचाळ, वाहन मालक चंद्रसिंग एकनाथ नाईक व पोलिसांचे लोकेशन देणारा ओम बापूराव नाईक (रा. मर्डसगाव, ता.पाथरी) यांना ताब्यात घेण्यात आले.

## ग्रामस्तरीय अधिकाऱ्यांना लॅपटॉप

# आधुनिक साधनांमुळे वाढणार कामांचा वेग

प्रतिनिधी। **छत्रपती संभाजीनगर**

परभणी तालुक्यातील ९ मंडळ अधिकारी आणि ५२ ग्राम महसूल अधिकाऱ्यांना अत्याधुनिक लॅपटॉप व प्रिंटरचे वितरण करण्यात आले. राज्य शासनाने डिजिटल लँड रेकॉर्ड मॉडर्निझेशन प्रोग्रॅम अंतर्गत अधिकार अभिलेख संगणकीकरण प्रक्रिया करण्याचे ठरवले आहे. कर्मचाऱ्यांना हे साहित्य दिल्यामुळे आता कामांना वेग येण्याची अपेक्षा आहे.

महसूल विभागाच्या डिजिटल कामकाजासाठी आधुनिक साधनांची आवश्यकता लक्षात घेऊन तलाठी संघटनेकडून गेल्या महिन्यांपासून शासनाकडे नवीन लॅपटॉप व प्रिंटरची मागणी करण्यात येत होती. शासनाने यापूर्वी सन २०१६ मध्ये लॅपटॉप व प्रिंटर उपलब्ध करून दिले होते. मात्र, बदलत्या तंत्रज्ञानामुळे ती यंत्रणा कालबाह्य झाली आहे. सुधारित ऑनलाइन प्रणालीवर काम करताना अनेक तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याने शेतकरी व नागरिकांची कामे वेळेत पूर्ण करणे कठीण होत होते.

नव्याने मिळालेल्या संगणकीय सुविधांमुळे महसूल विभागाचे कामकाज अधिक वेगवान, पारदर्शक आणि कार्यक्षम होणार आहे. विशेषतः ई-फेरफार, ई-चावडी, ई-पीक पाहणी, सातबारा उतारे, फेरफार नोंदी, नवीन ई-पंचनामा प्रणाली तसेच नैसर्गिक आपत्ती अनुदान वाटप यांसारख्या महत्त्वाच्या सेवा अधिक सुलभपणे नागरिकांपर्यंत पोहचणार आहेत. त्यामुळे शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

साधने वाटप कार्यक्रमास तहसीलदार संदीप राजपुरे, नायब तहसीलदार राजकुमार राठोड, मंडळ अधिकारी नंदकिशोर सोनवणे, शिवाजी मोरे, प्रवीण खाडे उपस्थित होते.

### उपविभागीय अधिकाऱ्यांना विश्वास

यावेळी बोलताना उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले यांनी महसूल विभागातील डिजिटल सेवांचा विस्तार ही काळाची गरज असल्याचे सांगितले. नवीन यंत्रसामग्रीमुळे नागरिकांना अधिक जलद व दर्जेदार सेवा देता येतील, असा विश्वास व्यक्त केला.

## जालना जिल्ह्यात खताचा पुरेसा साठा

प्रतिनिधी। जालना

खरीप हंगाम हंगाम तोंडावर असताना जालना जिल्ह्यात खतांचा बफर स्टॉक केल्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. जिल्ह्यात युरियाचा तब्बल ९९.८४ टक्के सुरक्षित साठा पूर्ण झाला आहे. विविध रासायनिक खतांचा एकूण १ लाख ७० हजार ३९८ मेट्रिक टन साठा उपलब्ध आहे. त्यापैकी ४६ हजार ७९१ मेट्रिक टन खतांची विक्री झाली असून सध्या १ लाख २३ हजार ६०७ मेट्रिक टन खतसाठा शिल्लक आहे.

जिल्हा परिषदेच्या कृषी विकास अधिकारी कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार, खरीप हंगामासाठी जिल्ह्यात युरियाची मागणी १ लाख १७ हजार ४८२ मेट्रिक टन इतकी आहे. त्यापैकी आतापर्यंत ७२ हजार ५०० मेट्रिक टनचे वाटप करण्यात आले असून १९ हजार ८५६ मेट्रिक टन साठा उपलब्ध आहे. एनपीके खताचा सर्वाधिक ५८ हजार ७६७ मेट्रिक टन साठा जिल्ह्यात उपलब्ध असून एसएसपी खताचाही २६ हजार ५२६ मेट्रिक टन साठा शिल्लक आहे.



## पिकअपसह ११ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

# लोखंडी सळया चोरणारा जेरबंद

प्रतिनिधी। **भोकरदन**

बुलडाणा जिल्ह्यातील धाड येथून सळयासह पिकअप चोरी हसनाबाद पोलिसांच्या सतर्कतेमुळे पकडली गेली. गस्ती पथकाने भरधाव जाणारे हे वाहन थांबवून चौकशी केल्यानंतर हा प्रकार उघड झाला.

याबाबत अधिक माहिती अशी की,हसनाबाद पोलिस ठाण्याचे पोलिस कर्मचारी भरत कुमार चौधरी, नारायण चरावंडे, दीपक सोनुने, प्रकाश बोर्डे हे ३० मे च्या रात्रीपासून गस्त घालत होते. पहाटे पाचच्या सुमारास त्यांना हसनाबाद फाटा येथून एक महिंद्रा कंपनीचा पिकअप सुसाट वेगाने येताना दिसला. संशय आल्याने पोलिसांनी तो थांबविला. चालकाला वाहनाबाबत विचारणा केली असता त्याने तो महिंद्रा पिकअप स्वतःच्या मालकीचा असल्याचे सांगितले. लोखंडी सळयाबाबत चौकशी केली असता त्याला नीट माहिती देता आली नाही. पोलिसांनी पिकअप चालकास विश्वासात घेऊन विचारणा केली असता त्याने त्याचे नाव विजय बाबुराव पाखरे ( रा. अंबड, साठेनगर जि. जालना) असल्याचे सांगितले.

### धाड पोलिस ठाण्याच्या हद्दीतून चोरी

पोलिसांनी अधिक चौकशी केली असता हा मुद्देमाल बुलडाणा जिल्ह्यातील धाड पोलिस ठाण्याच्या हद्दीतून चोरी केल्याचे निष्पन्न झाले आहे. चोरी उघड झाल्यानंतर पोलीस कारवाई करत आहेत.

## हिंगोली जिल्ह्यात बँकांना ४,३१३ कोटींचे कर्ज उद्दिष्ट

### वार्षिक ऋण योजना अहवालाचे प्रकाशन



प्रतिनिधी। **हिंगोली**

या वार्षिक ऋण योजनेअंतर्गत जिल्ह्यातील कृषी पीक कर्ज, कृषी पूरक व जोडव्यवसाय कर्ज, शासकीय योजनांतर्गत उद्योग कर्ज, प्राधान्य क्षेत्र तसेच अग्रक्रम नसलेल्या क्षेत्रातील विविध योजनांचा समावेश करण्यात आला आहे. या योजनांसाठी जिल्हाभरातील बँकांना एकूण ४ हजार ३१३ कोटी रुपयांचे कर्ज उद्दिष्ट देण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा बँक सल्लागार समितीची बैठक संपन्न झाली. यावेळी उद्दिष्ट अहवाल २०२६-२७चे प्रकाशन जिल्हाधिकारी गुप्ता यांच्या हस्ते करण्यात आले. या बैठकीस जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक सुजित झोडगे, नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक अविनाश लहाने, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे गलांडे, ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थेचे बनसोड, विविध बँकांचे शाखा व्यवस्थापक उपस्थित होते.

## पिसाळलेल्या कुत्र्यांचा जालन्यात उच्छाद

प्रतिनिधी। **जालना**

शहरात वाढती अस्वच्छता, तुंबलेले नाले आणि मोकाट तसेच पिसाळलेल्या कुत्र्यांच्या दहशतीमुळे नागरिकांचे जगणे असुरक्षित झाले आहे. या प्रश्नांवर काँग्रेसने महापालिकेस निवेदन देत हा समस्या सोडवण्याची मागणी केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, शहर कचऱ्याच्या विळख्यात अडकले असून रस्त्यांवर पिसाळलेल्या कुत्र्यांचा हैदोस सुरू आहे. प्रशासन मात्र बघ्याची भूमिका घेत आहे. संग्रामनगर, कन्हैयानगर, लालबाग, इंडियननगर, नॅशनलनगर, चंदनझिरा, साठे नगर तसेच जुना जालना भागात नाल्यांमध्ये गाळ, कचरा आणि सांडपाणी साचल्याने दुर्गंधी पसरली आहे. पावसाळा तोंडावर असतानाही नालेसफाईकडे दुर्लक्ष झाल्याने डेंग्यू, मलेरिया आणि साथीच्या रोगांचा धोका वाढला आहे.

# नाथसागर धरणात बुडून दोन तरुणांचा मृत्यू

### छत्रपती संभाजीनगरहून पोहण्यासाठी आले होते सात जीवलग मित्र

प्रतिनिधी। **छत्रपती संभाजीनगर**

पैठण येथील नाथसागर धरणाच्या पाण्यात छत्रपती संभाजीनगर येथून पोहण्यासाठी गेलेल्या सात मित्रांपैकी दोन जण बुडून मृत्यू पावले. ही घटना ३१ मे सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास घडली. संकेत सिद्धार्थ खरात (वय १८ वर्षे) आणि अनिकेत मनू भारती (वय १९ वर्ष, दोघेही रा. अंबिकानगर, गल्ली नंबर ७, मुकुंदवाडी, छत्रपती संभाजीनगर) अशी मृत तरुणांची नावे आहेत. यातील संकेत खरात याचा मृतदेह रविवारी सायंकाळी, तर अनिकेत भारतीचा मृतदेह सोमवारी सकाळी सापडला.

मुकुंदवाडी परिसरातील सात मित्रांनी वाढत्या उन्हामुळे थंड पाण्याच्या ठिकाणी जाऊन पोहण्याची योजना आखली होती. त्यानुसार रविवारी दुपारी अडीच वाजता हे सर्वजण एका ऑटो रिक्षाने पैठण येथे आले. सायंकाळी पाचच्या सुमारास नाथसागर धरणावर पोहोचल्यावर धरणाच्या पाण्यासोबत रील्स आणि फोटो काढण्यात सर्व मित्र मग्न झाले. काही वेळाने यातील पाच मित्र पाण्यामध्ये पोहण्यासाठी उतरले. पोहता येत नसतानाही संकेत खरात आणि अनिकेत भारती हे दोघेही पाण्यात उतरले. मात्र, पाण्याचा अंदाज न आल्याने दोघेही खोल पाण्यात बुडू लागले. हे लक्षात येताच इतर मित्रांनी वाचवण्यासाठी एकच आरडाओरडा केला. धरणावर आलेल्या पर्यटकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली. घटनेची माहिती मिळताच पैठणचे पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांच्या सूचनेवरून सपोनि चंद्रकांत पवार, पोलीस उपनिरीक्षक वैभव सारंग, जमादार राजेंद्र जिवडे आणि भाऊसाहेब तांबे यांचे पथक तात्काळ दाखल झाले. नगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी स्थानिक जीवरक्षकांच्या मदतीने पाण्यात शोधकार्य सुरू केले. शोध मोहिमेदरम्यान संकेत खरात याचा मृतदेह जवानांच्या हाती लागला. अंधार पडल्याने शोधकार्य थांबवण्यात आले होते. सोमवारी सकाळी अनिकेत मनू भारती याचा याचा मृतदेह सापडला. तो शवविच्छेदन नेण्यात आला.





### नातेवाईकांचा धरणावर रात्रभर आक्रोश

धरणावर दुर्घटना घडल्याची माहिती मिळताच दोन्ही तरुणांच्या नातेवाईकांनी छत्रपती संभाजीनगरहून थेट पैठण धरणावर धाव घेतली. आपल्या पोटच्या गोळ्याचा बुडून मृत्यू झाल्याचे समजताच पालकांनी आणि नातेवाईकांनी धरणाच्या काठावर केलेला आक्रोश उपस्थितांचे काळीज पिळवटून टाकणारा होता. अनिकेतचे नातेवाईक रात्रीभर नाथसागराच्या तिरावर बसून होते.

## रायखेडा पाटीजवळ अज्ञात वाहनाची दुचाकीला धडक

# कोमातील भावाच्या उपचारासाठी पैसे घेऊन जाणाऱ्या तरुणाचा दुर्दैवी मृत्यू


प्रतिनिधी। **परभणी**

कोमात असलेल्या भावाच्या उपचारासाठी पैसे घेऊन जाणाऱ्या एका तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना जालना रस्त्यावरील रायखेडा पाटीजवळ रविवारी सकाळी साडेसातच्या सुमारास घडली. अनिल देवीदास सुर्वे (वय २५), असे त्याचे नाव आहे. तो दुचाकीवरून छत्रपती संभाजीनगरकडे जात होता.

या विषयी अधिका माहिती अशी की, हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातील दताड येथील अनिल देवीदास सुर्वे यांचा भाऊ मागील दीड महिन्यांपासून संभाजीनगर येथील रुग्णालयात कोमात आहे. त्याच्या उपचारासाठी लागणारे पैसे घेऊन अनिल सुर्वे आणि त्यांचा मित्र संकेत दत्ता बेले (वय २५, रा. पुसद) हे दोघे दुचाकीवरून जिंतूरमार्गे संभाजीनगरकडे जात होते. त्यावेळी रायखेडा पाटीजवळ अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. अपघातानंतर दोघेही गंभीर जखमी अवस्थेत रस्त्यावर पडलेले आढळून आले. स्थानिकांच्या मदतीने त्यांना तत्काळ जिंतूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

वैद्यकीय अधिकारी डॉ. शेख अजीज यांनी तपासणी करून अनिल सुर्वे यांना मृत घोषित केले. तर संकेत बेले यांच्या डोक्याला तसेच हात-पायांना गंभीर दुखापत झाल्याने प्राथमिक उपचारानंतर त्यांना पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. घटनेची माहिती मिळताच चारठाणा पोलीस ठाण्याचे सपोनि मुजाजी दळवे, पोहेका उध्दव माने व हरिभाऊ गायकवाड यांनी घटनास्थळ व रुग्णालयाला भेट दिली.

### गावासह पंचक्रोशीत हळहळ व्यक्त



अनिल सुर्वे यांच्या पश्चात पत्नी व एक लहान मुलगी असा परिवार आहे. एकीकडे भाऊ कोमात असताना त्याच्या उपचारासाठी धावपळ करणाऱ्या भावाचाच अपघाती मृत्यू झाल्याने दताड गावासह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. सुर्वे कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला असून गावात शोककळा पसरली आहे.

## परभणीत तरुणाचा घरातच निर्घृण खून

प्रतिनिधी। **परभणी**

शहरातील खंडोबा बाजार कॉर्नर परिसरात एका तरुणाचा त्याच्या राहत्या घरात रक्ताच्या थारोळ्यात पडलेले मृतदेह आढळला. फिरोज खान अब्दुला खान (वय ३०), असे या तरुणाचे नाव आहे. प्राथमिक तपासात त्याची धारदार शस्त्राने वार करून हत्या केल्याचा अंदाज आहे. ही घटना ३१ मे रोजी सकाळी उघडकीस आल्यानंतर नानलपेठ पोलिस ठाण्याच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. फॉरेन्सिक टीम आणि डॉग स्कॉडलाही पाचारण करण्यात आले होते व घटनास्थळाचे बारकाईने निरीक्षण सुरू करण्यात आले होते. मृताच्या मानेवर आणि पोटावर धारदार शस्त्राने गंभीर वार झाल्याचे प्राथमिक निरीक्षणात समोर आले आहे. आरोपी ओळखीतील असण्याची शक्यता वर्तविली आहे. याचा तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

## कन्नड तालुक्यातील देभेगावची घटना, गुन्हा दाखल

# शेतीच्या वादात पुतण्याचा निर्घृण खून, आधी कारने धडक, त्यानंतर मारहाण

प्रतिनिधी। **कन्नड**

तालुक्यातील देभेगाव येथे शेतीच्या वादातून चुलत नात्यातील कुटुंबीयांमध्ये झालेल्या संघर्षाने रक्तरंजित वळण घेतले. तक्रार देण्यासाठी पोलिस ठाण्याकडे निघालेल्या तरुणाला भरधाव जीपने उडवून दिल्यानंतर जखमी अवस्थेतही बेदम मारहाण करण्यात आली. या घटनेत तरुणाचा मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून गावात तणाव निर्माण झाला आहे.

योगेश कानिफनाथ थोरात (३५, रा. देभेगाव, ता. कन्नड) असे मृत तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी प्रल्हाद जगन्नाथ थोरात याच्यासह इतर आरोपींविरुद्ध देवगाव रंगारी पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, देभेगाव येथील गट क्रमांक ७८ मधील शेतीच्या मालकी व बांधाच्या वादातून थोरात कुटुंबीयांमध्ये काही दिवसांपासून वाद सुरू होता. २९ मे रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास काका जगन्नाथ रंगनाथ थोरात आणि पुतण्या योगेश कानिफनाथ थोरात यांच्यात शाब्दिक वाद झाला. या वादाचे पर्यवसान हाणामारीत झाले. या झटापटीत जगन्नाथ थोरात यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली.

या घटनेची तक्रार देण्यासाठी योगेश थोरात आणि त्यांची पत्नी दुचाकीवरून देभेगाव येथून देवगाव रंगारी पोलिस ठाण्याकडे निघाले होते. जगन्नाथ थोरात यांचा मुलगा प्रल्हाद थोरात याला वडिलांना झालेल्या मारहाणीची माहिती मिळाल्यानंतर त्याने मित्रासह कारने पाठलाग करून देभेगाव गावाच्या वेशीजवळ भरधाव कारने योगेश थोरात यांच्या दुचाकीवर घातली.

### उपचारादरम्यान तरुणाचा मृत्यू



कारची दुचाकीला धडक दिल्यानंतर योगेश आणि त्यांची पत्नी रस्त्यावर फेकले गेले. एवढ्यावरच आरोपी थांबले नाहीत. त्यांनी जखमी योगेश थोरात यांना लाथाबुक्क्यांनी व काठ्यांनी जबर मारहाण केली. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

**भरतीची प्रतीक्षा** | माता-बाल संगोपन, लसीकरण, प्राथमिक आरोग्य सेवा प्रभावित

# मनुष्यबळाअभावी आरोग्य व्यवस्थेला घरघर

प्रतिनिधी। **छत्रपती संभाजीनगर**

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रांमध्ये परिचारिका व आरोग्य कर्मचाऱ्यांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. यामुळे ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था अडचणीत आली आहे. विशेषतः आरोग्य सेविकांची तब्बल २२९ पदे रिक्त असल्याने ग्रामीण भागातील माता-बाल संगोपन, लसीकरण आणि प्राथमिक आरोग्यसेवा प्रभावित होत आहे.

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत जिल्ह्यात ५३ प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि २४९ उपकेंद्रे कार्यरत आहेत.आरोग्य समितीच्या बैठकीत सादर करण्यात आलेल्या माहितीनुसार, आरोग्य सेवक (पुरुष) यांची २७५ पदे मंजूर असून त्यापैकी २४३ पदे भरलेली आहेत, तर ३२ पदे रिक्त आहेत. महिला आरोग्य सेविका अर्थात परिचारिकांची ४९१ पदे मंजूर असताना केवळ २६२ पदे भरलेली असून २२९ पदे रिक्त आहेत.

वैद्यकीय अधिकाऱ्यांची ११९ मंजूर पदांपैकी केवळ ७२ पदांवर अधिकारी कार्यरत आहेत. उर्वरित रिक्त पदांची जबाबदारी ३९ कंत्राटी डॉक्टरांवर आहे. आरोग्य सहायक (पुरुष) यांच्या ७७ मंजूर पदांपैकी ७२ पदे भरलेली असून पाच पदे रिक्त आहेत. तसेच औषध निर्माण अधिकारी (फार्मासिस्ट) यांच्या ६० मंजूर पदांपैकी ५३ पदे भरलेली असून सात पदे रिक्त आहेत.

आरोग्यसेवेचा भार तुटपुंज्या कर्मचाऱ्यांच्या भरवशावर दरम्यान, अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कार्यरत असलेले कर्मचारी आणि वैद्यकीय अधिकारी नियमितपणे उपस्थित राहत नसल्याच्या तक्रारी स्थायी समिती व आरोग्य समितीच्या बैठकीत समोर आल्या. काही वैद्यकीय अधिकारी ग्रामीण भागात वास्तव्यास राहत नसल्याने नागरिकांना वेळेवर उपचार मिळण्यात अडचणी येत असल्याचे सदस्यांनी निदर्शनास आणून दिले. प्राथमिक आरोग्य केंद्र हे ग्रामीण भागातील वैद्यकीय सेवेचा कणा असतो. मात्र वेळेवर डॉक्टर, नर्स, वॉर्डबॉय उपलब्ध न झाल्याने रुग्णांना तातडीने उपचार मिळत नाहीत. मोजक्या कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण येत आहे.



### मुख्याधिकाऱ्यांचा कर्मचाऱ्यांना इशारा

यावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी गंभीर दखल घेत गैरहजर राहणाऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, रिक्त पदांचा मोठा आकडा आणि अपुरे मनुष्यबळ यामुळे ग्रामीण आरोग्यसेवेचा गाडा सध्या तुटपुंज्या कर्मचाऱ्यांच्या भरवशावर सुरू असल्याचे वास्तव समोर आले आहे.

## कांदा उत्पादकांचा आंदोलनाचा इशारा

# कांद्याला हमीभाव देण्याची कृउबा समितीकडे मागणी

प्रतिनिधी। **परंडा**

कांदा पिकाला भाव मिळत नसल्याने शेतकरी अडचणीत सापडले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांकडे लक्ष देऊन कांद्याला हमीभाव द्यावा यासह इतर मागण्यांचे निवेदन छावा संघटनेच्या वतीने कृषी उत्पन्न बाजार समितीला देण्यात आले.

सध्या कांदा पिकाला योग्य बाजारभाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. उत्पादन खर्चात मोठी वाढ झालेली असताना कांद्याला अत्यल्प दर मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. त्यामुळे शासनाने कांदा पिकासाठी तत्काळ अनुदान जाहीर करावे तसेच कांद्याला हमीभाव देऊन शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा द्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी शेख यांनी शासनाने शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित निर्णय घ्यावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा दिला.

या प्रसंगी मराठवाडा संपर्क प्रमुख अमरभाई शेख, जिल्हा उपाध्यक्ष आकाश नारायण जेधे, विधी सल्लागार ड. महेश चोपडे, तालुकाध्यक्ष सुधीर लटके, तालुका उपाध्यक्ष रामराजे काकडे, शहराध्यक्ष हरिभाऊ आदमीले, माजी सरपंच पंडित जगदाळे, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**नांदेड :** विधानपरिषद निवडणुकीसाठी भाजपा -शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे उमेदवार अमरनाथ राजूरकर यांनी आज अर्ज दाखल केला. यावेळी आ. श्रीजयाताई चव्हाण, महापौर कविता मुळे यांच्यासह भोकरचे नगराध्यक्ष भगवानराव दंडवे, शंकर बोलमवार, बिलोलीचे नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी, तुलजेश यादव, संदीपसिंग गाडीवाले, योगेश मुंढे, ॲड. महेश कनकदंडे, राजेश्वर देशमुख, मोईज भाई, मुदखेडच्या नगराध्यक्षा विश्रांती कदम, शकुंतला मुदीराज आदी.

## संक्षिप्त

### वीज पडून सहा शेळ्या एक गाय ठार

**उमरीः** तालुक्यातील बोळसा बुद्रुक येथील शेतकरी संतोष बाळोजी चिकटवाड. गट. नंबर २६ यांच्या शेतामध्ये १ जून रोजी सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास वादळी वाऱ्यासह अचानक पणे आलेल्या अवकाळी पाऊस यामध्ये वरील शेतकऱ्यांच्या शेतामध्ये अचानक वीज पडल्यामुळे सहा शेळ्या व एक गाय ठार झाल्याची माहिती बोळसा बुद्रुक येथील तलाठी यांच्याकडून मिळाली आहे. अत्यंत गरिबी परिस्थिती आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या शेतकऱ्यांवर नैसर्गिक आपत्तींमुळे खूप मोठ्या आर्थिक संकटात शेतकरी सापडल असून शासनाने तात्काळ पंचनामा करून आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना मदत करावी अशी मागणी शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात आली आहे .अचानक घडलेल्या या दुर्दैवी घटनेमुळे बोळसा बुद्रुक गावासहित उमरी तालुक्यात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

### तिर्रट जुगारावर पोलिसांचा छापा

**नांदेड:** बोंढारकडे जाणाऱ्या रोडवरील मोकळ्या जागेमध्ये तिर्रट नावाचा जुगार खेळवला जात होता. याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी ३१ मे रोजी सायंकाळी साडेसात वाजता छापा टाकून रोख रक्कम, तीन दुचाकी असा एकूण तीन लाख २१ हजार १९० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलिसांना बघताच सातहीजण पळून गेले. पोकॉ. सचिन चंद्रकांत चावरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नांदेड ग्रामीण ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. पोहेकॉ. सत्तार पुढील तपास करत आहेत.

### अवैध गुटखा प्रकरणी गुन्हा दाखल

**इस्लापूर :** सेवालाल चौक येथे काहीजण अवैधरित्या बाळगून असल्याची माहिती अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तेथे जाऊन प्रदीप शंकर डुडेल, गजानन शेषेराव पळसपुरे यांना विचारणा केली असता, त्यांच्याजवळ आठ हजार ९८८ रुपये किंमतीचा विविध कंपनीचा गुटखा मिळून आला. ही कारवाई ३१ मे रोजी दुपारी तीन वाजेच्या सुमारास करण्यात आली. अन्न सुरक्षा अधिकारी अरुण माधवराव तन्नडवार यांच्या फिर्यादीवरून इस्लापूर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सपोनि भोसले पुढील तपास करत आहेत.

### विष्णूपुरी येथून दुचाकी केली लंपास

**नांदेडः** विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयाच्या पार्किंगमधून शिवाजी राजाराम निलपत्रेवार (रा. धनेगा, ता.नांदेड) यांची ३० हजार रुपये किंमतीची दुचाकी (एमएच-२६, एजी-९५६५) ३१ मे रोजी सायंकाळी पावणेसात वाजेच्या सुमारास चोरीला गेली आहे. नांदेड ग्रामीण पोलिस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोहेकॉ. पांचाळ पुढील तपास करत आहेत.

## वादळाचा घाला ; खरिपापूर्वीच शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान

# निर्यातक्षम केळी बागा भुईसपाट

प्रतिनिधी | **मुदखेड**

तालुक्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांवर नैसर्गिक संकटाचा दुहेरी आघात झाला असून मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात झालेल्या वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसामुळे शेकडो हेक्टरवरील निर्यातक्षम केळीच्या बागा अक्षरशः भुईसपाट झाल्या आहेत. निर्यातीसाठी तयार असलेल्या दर्जेदार केळीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले असून त्यांच्या समोर गंभीर आर्थिक संकट उभे ठाकले आहे.

मुदखेड तालुक्यातील बारड, पांढरवाडी, निवघा, इजळी, शेंबोली तसेच परिसरातील अनेक गावांच्या शिवारात मोठ्या प्रमाणावर केळीची लागवड करण्यात आली आहे. यंदा केळीचे उत्पादन चांगले आले होते. अनेक शेतकऱ्यांच्या बागा काढणीसाठी सज्ज होत्या. मात्र मे महिन्याच्या अखेरीस आलेल्या वादळी वाऱ्याने आणि मुसळधार पावसाने या बागांचे मोठे नुकसान केले. अनेक ठिकाणी केळीची झाडे मुळासकट उन्मळून पडली, तर काही ठिकाणी घडांसह झाडे जमिनीवर कोसळल्याने उत्पादन पूर्णपणे उद्ध्वस्त झाले.पहिल्या वादळानंतर प्रशासनाने नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून पंचनामे केले होते. नायब तहसीलदार मारोती जगताप यांनी नुकसानीची नोंद करण्यात आल्याची माहिती दिली. मात्र, त्यानंतर ३१ मे रोजी पुन्हा आलेल्या वादळाने निवघा आणि इजळी परिसराला जबरदस्त तडाखा दिला. त्यामुळे आधीच संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत.



### नुकसानीच्या तुलनेत अत्यल्प मदतीमुळे नाराजी

केळी पिकासाठी प्रतिहेक्टर दोन ते अडीच लाख रुपयांपर्यंत खर्च येतो. खत, औषधे, मजुरी आणि सिंचन यासाठी मोठी गुंतवणूक करावी लागते. अशा परिस्थितीत एनडीआरएफच्या निकषानुसार केळी पिकाच्या नुकसानीसाठी केवळ २२ हजार ५०० रुपये प्रतिहेक्टर मदत दिली जात असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. झालेल्या प्रत्यक्ष नुकसानीच्या तुलनेत ही मदत अत्यल्प असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी शासनाने विशेष मदत जाहीर करून तातडीने आर्थिक दिलासा द्यावा, तसेच केळी उत्पादकांसाठी स्वतंत्र नुकसानभरपाई पॅकेज लागू करावे, अशी मागणी केली आहे.

निवघा येथील शेतकरी संजय शंकरराव पवार यांच्यासह अनेक शेतकऱ्यांच्या निर्यातक्षम केळीच्या बागा वाऱ्याच्या तडाख्यात पूर्णपणे कोसळल्या. काढणीच्या उंबरठ्यावर असलेले पीक काही क्षणांत जमीनदोस्त झाल्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर वर्षभराचे श्रम वाया गेले. निर्यातीसाठी तयार करण्यात आलेल्या दर्जेदार केळीचे नुकसान झाल्याने अपेक्षित उत्पन्नावरही पाणी फिरले आहे.वादळाने उद्ध्वस्त झालेल्या केळीच्या बागांमुळे मुदखेड तालुक्यातील शेतकरी सध्या मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करत आहेत.

## 'ऑपरेशन क्रॅकडाऊन'चा दणका ; १० जणांवर गुन्हा दाखल

# २.१५ कोटी रूपयांचा मुद्देमाल केला जप्त

प्रतिनिधी | **नांदेड**

जिल्ह्यातील अवैध व्यवसाय, वाढती गुन्हेगारी आणि सराईत गुन्हेगारांच्या कारवायांना आळा घालण्यासाठी नांदेड जिल्हा पोलीस प्रशासनाने सुरू केलेल्या 'ऑपरेशन क्रॅक डाऊन' मोहिमेअंतर्गत मोठी कारवाई करण्यात आली आहे. गोदावरी नदीपात्रातून सुरू असलेल्या अवैध रेती उपशावर पोलिसांनी धडक छापा टाकत तब्बल १० आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून २ कोटी १५ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे अवैध रेती तस्करांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी अवैधरित्या गौण खनिज अर्थात रेतीचा उपसा व वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे आदेश सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना दिले होते. त्यानुसार नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथकाने गुप्त माहितीच्या



आधारे गंगाबेट शिवारातील गोदावरी नदीपात्रात सापळा रचला. ३१ मे रोजी रात्री सुमारे १०.१० वाजता पोलिसांनी अचानक छापा टाकला असता काही जण नदीपात्रातून मोठ्या प्रमाणात अवैध रेतीचा उपसा करून हायवा व ट्रॅक्टरच्या सहाय्याने वाहतूक करत असल्याचे आढळून आले. पोलिसांनी तातडीने कारवाई करत घटनास्थळावरून एक टाटा कंपनीचा हायवा (एमएच २६ सीएच ९४००) ज्यामध्ये पाच ब्रास रेती भरलेली होती, एक भारत बेंझ कंपनीचा हायवा (एमएच १४ एमएच ८८४९), एक ट्रॅक्टर व ट्रॉली, दोन मोठ्या लोखंडी बोटी, ११ इंजिन तसेच मोठ्या प्रमाणातील रेती जप्त केली.

याशिवाय अवैध उत्खननासाठी वापरण्यात येणारे ५२ तराफे आणि १०४ ब्रास रेती जागीच नष्ट करण्यात आली. जप्त करण्यात आलेल्या साहित्याची एकूण किंमत २ कोटी १५ लाख ६५ हजार रुपये इतकी असल्याचे पोलिसांनी सांगितले.

या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात आरोपी बालाजी अशोक सांगळे (रा. वामणी), बळीराम गोवर्धन चव्हाण (रा. लिंबोटी तांडा), अशोक मोरे (रा. सोनखेड), अतुल प्रभाकर गच्चे (रा. जवळा) यांच्यासह सहा अनोळखी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३(५), महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम ४८(७), ४८(८) तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ९ व १५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सिडकोत चोरट्यांचा हैदोस

प्रतिनिधी | **नांदेड**

सिडको हडको भागातील किसान नगर सोसायटी अंतर्गत भर वस्तीत गजबजलेल्या ठिकाणी शिवाजी विद्यालयाच्या समोर असलेल्या भागात भर दिवसा महिला घरी येत असताना दोन-तीन चोरटे गळ्यातील गंठण ओढून चोरून नेले. ही घटना दिनांक १ जून रोजी सायंकाळी सात वाजेच्या दरम्यान घडली घटनेची फिर्याद सौ. ललिता यलप्पा कोलेवाड यांनी ग्रामीण पोलीस स्टेशन सिडको येथे दिली आहे.



सिडको हडको भागात दिवसेंदिवस चोरांचा सुळसुळाट वाढत असून मध्यमवर्गीय लोकांना या भागात राहणे मुश्किल झाले आहे. दररोज चोरटे उजळ माथ्याने वस्तीमध्ये वावरतांना दिसतात. परंतू पोलिसांचे याकडे लक्ष नसते. दररोज लहान मोठ्या चोरीच्या घटना या घडत आहेत.महिलांच्या अंगावरील दागिणे पळविण्याचे प्रकार नेहमीच घडत आहेत. तर नागरिकांच्या घराचे दार तोडून चोरटे ऐवज लंपास करण्यात यशस्वी होत आहेत.विशेष म्हणजे चोरटे हात साफ करून पसार होतात.

ग्रामीण पोलिसांनी अशा चोरट्यांचा चोख बंदोबस्त करून येथील रहिवांशाना दिलासा द्यावा अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

## पत्त्याच्या डावावरील वाद खुनी संघर्षात बदलला

# मित्राला वाचविताना तरुणाने जीव गमावला

प्रतिनिधी | **हदगाव**

तालुक्यातील निवघा बा. येथे शनिवार-रविवारच्या मध्यरात्री पत्याच्या डावावर मित्रांमध्ये सुरू असलेला पैशांचा किरकोळ वाद थेट खुनी संघर्षात बदलला. आपल्या जिवलग मित्राला आरोपी चाकूने भोसकत असल्याचे पाहून त्याला वाचवण्यासाठी मध्यस्थी करणाऱ्या एका २३ वर्षांच्या निष्पाप तरुणाच्या पोटात आरोपीने अत्यंत क्रूरपणे चाकू खुपसला. हा वार इतका भयानक आणि कडक होता की तरुणाचा कोथळाच बाहेर आला! या भीषण हल्ल्यात अतिरक्तस्त्रावामुळे तरुणाचा जागीच करुण अंत झाला. या हत्याकांडामुळे संपूर्ण हदगाव परिसरात आणि नांदेड जिल्ह्यात एकाच रात्रीत तीव्र खळबळ उडाली आहे.

पोलीस आणि प्रत्यक्षदर्शींकडून मिळालेल्या अधिकृत माहितीनुसार, विजय नारायण (बाळू) कदम (वय २३ वर्षे, रा. निवघा बा.) असे खून झालेल्या दुर्दैवी तरुणाचे नाव आहे. तर त्याचा मित्र रामा मारोती गजभारे (वय २२ वर्षे) हा या हल्ल्यात गंभीर जखमी झाला आहे. शनिवारी रात्री १० वाजेच्या सुमारास विजय कदम हा त्याचा मित्र रामा गजभारे याच्यासोबत गावात पत्याचा डाव खेळत बसला होता. त्याच वेळी दुसऱ्या गटातील त्यांचेच काही मित्र तिथे आले. या मित्रांमध्ये आधीपासून दिलेल्या काही पैशांच्या देण्याघेण्यावरून (उष्णवारी) वाद सुरू झाला. मयत विजय आणि रामाने त्यांच्याकडे दिलेले पैसे परत मागितले, यावरून दोन्ही बाजूंनी कडक वाद झाला.

वाद विकोपाला गेला आणि समोरच्या गटातील एका आरोपीने अचानक धारदार चाकू काढून रामा गजभारे याच्यावर हल्ला चढवला. आपल्या डोळ्यांसमोर मित्रावर चाकू चालत असल्याचे पाहून विजय कदम याने जीवाची बाजी लावून रामाच्या आणि आरोपींच्या मध्ये उडी घेतली. मात्र, आरोपी पूर्णपणे राग आणि दारूच्या नशेत तर्र असल्यामुळे त्याने कसलाही विचार न करता थेट विजयच्याच पोटात अत्यंत ताकदीने चाकू भोसकला. हा वार एवढा कडक होता की विजयचा कोथळा जागीच बाहेर आला आणि प्रचंड रक्ताच्या थारोळ्यात तो जमिनीवर कोसळला. स्थानिक नागरिकांनी जखमी विजयला तात्काळ उपचारासाठी नांदेड जिल्हा रुग्णालयात हलवले, मात्र डॉक्टरांनी तपासणी करून त्याला आणण्यापूर्वीच मृत घोषित केले.

## अनधिकृत भाजी मार्केटचा प्रश्न कायम

# महानगरपालिका प्रशासनाच्या उदासीनतेमुळे नागरिक संतप्त

प्रतिनिधी | **नांदेड**

शहरातील पूर्णा रोडवरील अनधिकृत भाजी मार्केट आणि फेरीवाल्यांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत चालला आहे. महावितरण व टेलिफोन कार्यालयापासून ते थेट छत्रपती चौकापर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूंना भरणारे हे भाजी मार्केट अपघातांना आमंत्रण देत आहे. मात्र, महानगरपालिका प्रशासनाच्या उदासीनतेमुळे हा प्रश्न अद्याप सुटू शकलेला नाही.

पूर्णा रोड हा शहरातील एक गजबजलेला मुख्य रस्ता आहे. या रस्त्यावरून दिवस-रात्र लहान-मोठी वाहने मोठ्या संख्येने धावत असतात. मात्र, दररोज सकाळी ६ ते ११ वाजेपर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूंना भाजीविक्रेते आणि फेरीवाले ठाण मांडून बसतात. यामुळे मुख्य रस्त्याची रुंदी कमालीची कमी होते. भाजी खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांची गर्दी आणि रस्त्यावरच पार्क केली जाणारी वाहने यामुळे या परिसरातून जाताना वाहनधारकांना मोठी कसरत करावी लागत आहे.

सकाळच्या सत्रात या रस्त्यावर पादचारी आणि वाहनांची प्रचंड कोंडी होते. वाहतूक विस्कळीत झाल्यामुळे येथे नेहमी छोटे-मोठे वाद होतात. एखादे अवजड वाहन आल्यास या गर्दीत मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. महापालिकेचे अतिक्रमण विरोधी पथक कधीतरी या भागात येते आणि थातूर-मातूर कारवाई करून निघून जाते. पथक गेले की पुन्हा परिस्थिती जैसे थे होते.

### शहरात पावसाची दमदार हजेरी

प्रतिनिधी : **नांदेड**

सोमवारी रात्री १० वाजताच्या सुमारास अवेळी पावसाने दमदार हजेरी लावल्याने नागरिकांना अल्पशा दिलासा मिळाला असून या पावसामुळे उकाडा कमी झाला आहे.दरम्यान पाऊस सुरू होताच नेहमीप्रमाणे वीज गायब झाली.

## छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी

प्रतिनिधी : **उमरी**

स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.दि. १ जून रोजी सकाळी ८.३० वाजता मोंढा मैदान येथे भव्य शिवगर्जना व ढोल ताशाच्या गजरात ध्वजारोहण छत्रपती संभाजी महाराज जन्मसत्व समितीचे अध्यक्ष सर्जेराव ढगे. यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले त्यानंतर भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी ४ वाजता महाराष्ट्राचे सुपर प्रसिद्ध कीर्तनकार अवधूत गांधी. यांच्यावतीने शिवभक्ती व देशभक्ती गीतांचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमासाठी भव्यदिवे व्यासपीठ व विद्युत रोशनी करण्यात आली होती भव्य दिवे व्यासपीठ व करण्यात आलेले विद्युत रोशनी सर्वांचेच आकर्षणाचे केंद्रबिंदू बनले होते. कार्यक्रमासाठी तालुक्यातील उद्योजक मारोतरावकवळे गुरुजी. संजय कुलकर्णी, संदीप कवळे, कैलास गोरठेकर. यांच्यासोबत तालुक्यातील शिवप्रेमी व जिल्ह्यातील शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ज्येष्ठ विधीज्ञ प्रकाश टोम्पे यांचे निधन

प्रतिनिधी | **नांदेड**



येथील ज्येष्ठ विधीज्ञ नांदेड जिल्हा अभियोक्ता संघाचे माजी अध्यक्ष ॲड. प्रकाश दत्तात्रेय टोम्पे यांचे संध्याकाळी अल्पशा आजाराने एका खासगी रुग्णालयामध्ये निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर एक जून रोजी रात्री १० वाजता गोवर्धन घाट स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी जिल्हा न्यायालयातील असंख्य वकील नातेवाईक व मित्रपरिवार उपस्थित होता. दिवंगत प्रकाश टोम्पे यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सून असा परिवार आहे.

### नालीचे काम संथगतीने सुरू

प्रतिनिधी : **नांदेड**

शहरातील मालेगाव रोडवर सुरू असलेल्या नाल्याचे काम संथ गतीने सुरू आहे.गेल्या काही दिवसांपासून या कामासाठी खोदकाम केल्यामुळे रस्त्यावर घाणीचे साम्राज्य पसरल्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून नागरिकांना त्रास सोसावा लागत आहे.

**शुभमंगल** | **अधिक मासानंतर जून, जुलैमध्ये १४ शुभ मुहूर्त**

# १९ जूनपासून पुन्हा सुरू होणार शुभविवाहाचा धडाका

प्रतिनिधी | **नांदेड**

सध्या सुरू असलेल्या अधिक मासामुळे विवाहसोहळ्यांवर तात्पुरता ब्रेक लागला असला, तरी आता लग्नाची प्रतीक्षा करणाऱ्या वधू-वरांसाठी आनंदाची बातमी आहे. अधिक मास समाप्त होताच १९ जूनपासून शुभविवाहांचे मुहूर्त सुरू होत असून ११ जुलैपर्यंत तब्बल १४ शुभ मुहूर्त उपलब्ध आहेत. त्यामुळे लग्नासाठी इच्छुक असलेल्या कुटुंबांमध्ये पुन्हा एकदा लगबग आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

हिंदू धर्मशास्त्रानुसार अधिक मास, ज्याला 'धोंड्याचा महिना' असेही संबोधले जाते, हा धार्मिक साधना, दानधर्म आणि पूजाअर्चे साठी महत्त्वाचा मानला जातो. मात्र या काळात विवाह, मुंज, गृहप्रवेश यांसारखी मांगलिक कार्ये टाळली जातात.

त्यामुळे १७ मेपासून १५ जूनपर्यंत विवाहासाठी कोणताही शुभ मुहूर्त नव्हता. परिणामी अनेक कुटुंबांनी आपल्या मुला-मुलींच्या विवाहाचे नियोजन पुढे ढकलले होते.आता अधिक मास समाप्त झाल्यानंतर विवाहसोहळ्यांना पुन्हा सुरुवात होणार आहे.

विशेष म्हणजे या कालावधीनंतर गुरू आणि शुक्र ग्रह अस्त होणार असून त्याचबरोबर चातुर्मासालाही सुरुवात होईल. धार्मिक मान्यतेनुसार या काळातही विवाहासारखी मांगलिक कार्ये केली जात नाहीत. त्यामुळे ११ जुलैनंतर लग्नासाठी इच्छुकांना दीर्घ प्रतीक्षा करावी लागू शकते.

### असे आहेत १४ शुभ मुहूर्त



१९ जून हा शुभविवाहाचा पहिला मुहूर्त असून जून महिन्यात २०, २२, २३, २४ आणि २७ जून असे एकूण सहा शुभ दिवस उपलब्ध आहेत. त्यानंतर जुलै महिन्यात १, २, ३, ४, ७, ८, ९ आणि ११ जुलै असे आठ शुभ मुहूर्त आहेत. त्यामुळे अवघ्या २३ दिवसांच्या कालावधीत १४ शुभ दिवस मिळाल्याने विवाहासाठी इच्छुक कुटुंबांची मोठी धावपळ सुरू होण्याची शक्यता आहे.

यामुळे विवाह ठरलेल्या कुटुंबांनी हॉल बुकिंग, केटरिंग, बँड-पथक, सजावट आणि इतर तयारीला वेग दिला आहे. विवाह मंडप तसेच विविध सेवा पुरवठादारांकडे चौकशी आणि बुकिंगची गर्दी वाढण्याची चिन्हे दिसत आहेत.

एकंदरीत, अधिक मासानंतर सुरू होणारे हे १४ शुभ मुहूर्त विवाहासाठी सुवर्णसंधी मानले जात असून, या काळात राज्यभरात लग्नसराईची धामधूम रंगणार असल्याचे चित्र आहे. ११ जुलैनंतर पुन्हा सहा महिन्यांचा खंड पडण्याची शक्यता असल्याने अनेक कुटुंबे याच कालावधीत विवाह उरकण्यावर भर देत आहेत.

# तहसील परिसरात इसमाची आत्महत्या

प्रतिनिधी | **लोहा**

शहरातील तहसील कार्यालय, पंचायत समिती, भूमी अभिलेख आणि रजिस्ट्री कार्यालयाच्या मुख्य प्रशासकीय परिसरात एका ४२ वर्षीय इसमाने लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे सोमवारी (१ जून) पहाटे उघडकीस आले. सरकारी परिसरात मृतदेह लटकलेल्या अवस्थेत आढळून आल्याने संपूर्ण लोहा शहरात एकच खळबळ उडाली असून प्रशासकीय यंत्रणेची मोठी धावपळ उडाली आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या अधिकृत माहितीनुसार, मारोती पुंडलीक बाचेवाड (वय ४२ वर्षे, रा. निळा, ता. लोहा) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. सोमवारच्या पहाटे नेहमीप्रमाणे प्रशासकीय कार्यालय परिसरात कर्तव्यावर असलेले पोलीस कर्मचारी श्रीरामे हे गस्त घालत होते. पहाटे साडेपाच वाजेच्या सुमारास त्यांना परिसरातील एका लिंबाच्या झाडाला एका इसमाने गळफास घेतल्याचे धक्कादायक दृश्य दिसले. त्यांनी तात्काळ घटनेचे गांभीर्य ओळखून लोहाचे तहसीलदार विठ्ठल परळीकर आणि पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने यांना माहिती दिली.घटनेची माहिती मिळताच उपविभागीय अधिकारी विलास नरवटे, तहसीलदार विठ्ठल परळीकर, तलाठी भूमेश्वर विभुते आणि महसूल सेवक माधव काकडे यांच्यासह पोलिसांच्या विशेष पथकाने घटनास्थळी धाव घेतली. मृत मारोती बाचेवाड यांच्या कुटुंबाला तात्काळ पाचारण करण्यात आले. कुटुंबीयांच्या उपस्थितीत मृतदेह झाडावरून खाली उतरवून लोहा येथील उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आला, तिथे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले.

### खिशात आढळली सुसाइड नोट

पोलिसांना मृत मारोती बाचेवाड यांच्या खिशात एक सुसाईड नोट आढळून आली आहे. या सुसाईड नोटमध्ये नेमका कोणाचा उल्लेख आहे आणि त्यांनी आत्महत्येसाठी थेट सरकारी कार्यालयाचाच परिसर का निवडला, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. याप्रकरणी लोहा पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने यांच्या थेट मार्गदर्शनाखाली पोलीस या सुसाईड नोटचा कडक तपास करत आहेत.